# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०१७-२०१८ या वर्षातील कार्याचा अहवाल
## [वर्ष ८३ वे]

**[प्रास्ताविक:-** अमृतमहोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करणारी आणि एकेकाळी बृहन्मुंबईतील बहुतेक सर्वच देशी खेळांचे तसेच सुमारे ८००-८५० संलग्न हुतुतु/कबड्डी मंडळे, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था, व्यायाम संस्थांचे तसेच पोस्ट, तारखाते, गिरण्या, रेल्वे, बँका, कारखाने, पोलीस अशा विविध व्यावसायिक संस्थांचे खेळविषयक नियमन करणारी 'मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ' ही संस्था 'एक खेळ-एक संस्था' [वन गेम वन फेडरेशन] या तत्वामुळे या संस्था आणि देशी खेळ जरी बाजूला झाले तरी आजही आपल्या ध्येयान्वेषी कार्यामुळे शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रात ताठ मानेने उभी आहे. दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन स्थापन झालेल्या संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्टयपूर्ण असे योगदान दिलेले आहे. त्यातुनच गेल्या ८२ वर्षात संस्थेने असंख्य खेळाडू, कार्यकर्ते, संशोधन मार्गदर्शक, तज्ञ आणि शिक्षक निर्माण केलेले आहेत. आजही मंडळाचे 'क्रीडाविश्व' हे त्रैमासिक, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, फिटनेस सेंटर आणि मंडळाकडून प्रतिवर्षी घेतल्या जाणा-या आणि पुरस्कृत केल्या जाणा-या विविध खेळांच्या भव्य स्पर्धा तसेच आयोजित करण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वैशिष्टयपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.]

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०१७-२०१८ या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. वर्षभरातील कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

**१.१ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बी.पी. एड. या दोन वर्षे कालावधीच्या दुस-या तुकडीच्या अभ्यासक्रमाच्या ३९ व्या आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या २० व्या [२०१७-१८] शैक्षणिक वर्षाची सुरूवात दि.१५ सप्टेंबर,२०१७ रोजी झाली. त्यादिवशी आयोजित करण्यात आलेला उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.संजय बाबुराव शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. बी.पी.एड. अभ्यासक्रमास ८८ पदवीधरांनी [६० पूरूष व २८ महिला] तर एम.पी.एड्. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमास एकूण २५ विद्यार्थ्यांना [१६ पूरूष व ९ महिला] प्रवेश दिला गेला. सदर प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाद्वारे पार पाडण्यात आली. बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाची सुरूवात दि.१७ जुलै २०१७ रोजी झाली.

**१.२ कुलपध्दती**

अधिक प्रभावी व परिणामकारकरित्या प्रशिक्षण देण्यासाठी आणि व्यवस्थापनदृष्टया सोयिस्कर व्हावे म्हणून सप्टेंबर महिन्यात बी.पी.एड. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमाच्या सर्व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांचे आनंद, प्रताप, संग्राम व विजय अशा चार तर महिलांचे प्रगती व शक्ती अशा दोन समतुल्य कुलांमध्ये [गटांमध्ये] त्यांचे शैक्षणिक, क्रीडा आणि कला यातील संपादन लक्षांत घेऊन विभाजन करण्यात आले.

**१.३ आंतरराष्ट्रीय योग दिन-**

दि.२१ जून, २०१७ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग' दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व शिक्षक सहभागी झाले होते.

**१.४ कार्यशाळा [विद्यापीठ कायदा २०१६] -**

महाविद्यालय आणि असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेस[ANGC], मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२३ जून २०१७ रोजी **'महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटीज ॲक्ट २०१६'** या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी डॉ.तुकाराम शिवारे, प्रिं. डॉ.मुरलीधर कु-हाडे, प्रिं. डॉ.विठ्ठल रोकडे, प्रिं.डॉ.शिरहट्टी, प्रिं.डॉ.वंजारी, प्रिं. डॉ. अजय भांगरे, प्रिं.डॉ.मधु नायर, प्रिं.डॉ.फडके, प्रिं.डॉ.राजपाल हांडे, श्री.डॉ.उध्दव भोसले, डॉ. बाळकृष्ण भोसले, श्री.रविंद्र करथडी, प्रिं.लहू पचांग, प्रिं.गार्गी, श्री.सुहासिनी संत, श्रीमती गीता इब्राहीम, श्रीमती शोभना मेनन, श्रीमती गीता बाळकृष्ण इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यशाळेत उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध शैक्षणिक संस्थांच्या सुमारे १०० व्यक्तींनी सहभाग घेतला.

**१.५ देशभक्तीपर गायन प्रशिक्षण व आंतरकुल समुहगान स्पर्धा**

दि.२५, २६ व २७ जुलै, २०१७ रोजी प्रसिध्द गायक श्री.सोमनाथ परब यांचे मार्गदर्शनाखाली बीपीएड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता समुहगीत गायन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच दि.१५ ऑगष्ट, २०१७ रोजी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे व शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर देशभक्तीपर समुहगीतांच्या आंतरकुल स्पर्धा पार पडल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन विविध वेश परिधान करून प्रभावीरित्या देशभक्तीपर समुहगीते सादर केली. तसेच बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता दि.२०, २१ व २२ डिसेंबर २०१७ या कालावधीत संगीत संचालक, कलामंच-एक सूर एकतालचे श्री.सोमनाथ परब यांच्या मार्गदर्शनाखाली समुहगीत प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

**१.६ व्याख्यान व कार्यशाळा –**

दि.५ ऑगष्ट,२०१७ रोजी महाविद्यालयात 'मार्गदर्शित प्रेरणा' या विषयावर 'योगदा' सत्संग सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी भाग घेतला.

**१.७ राष्ट्रीय दिन आयोजन:-**

प्रतिवर्षाप्रमाणे दि.१५ ऑगष्ट २०१७ या दिवशी 'स्वातंत्र दिन' तर दि.२६ जानेवारी २०१८ रोजी 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला.

**१.८ शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धा**

दि.७ सप्टेंबर,२०१७ रोजी शिक्षक दिनानिमित्त बीपीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**१.९ आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धाचे आयोजन [व्हॉलीबॉल]**

महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक-विद्यार्थ्यांनी दि.२७, २८ व २९ सप्टेंबर,२०१७ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या आंतर-महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धांचे महाविद्यालयाच्या-वतीने यशस्वीरित्या आयोजन केले.

**१.१० वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन-**

दि.१४ ऑक्टोंबर २०१७ या दिवशी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यायात **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, संस्थेचे सचिव मा.श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर व महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते. माजी राष्ट्रपती स्व.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून समारंभाची सुरूवात झाली. प्रथम काही विद्यार्थ्यांना अब्दूल कलाम यांच्यावरील कवितांचे वाचन झाले. त्यानंतर राष्ट्रपती स्व.अब्दूल कलाम यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

**१.११ राष्ट्रीय एकता दिन** - स्व.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त दि.३१ ऑक्टोंबर २०१७ रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस' याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे, लोणावळा योग संस्थेचे संचालक डॉ. मन्मथ घरोटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर तसेच महाविद्यालयासचे सर्व शिक्षक उपस्थित होते. समारंभाची सुरूवात स्व.सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होतो. नंतर डॉ.गो.वि. पारगांवकर यांनी सरदार पटेल व राष्ट्रीय एकता यावर आपले विचार मांडले. आपल्या अध्यक्षिय भाषणात मा.श्री.संजय शेटे साहेबांनी त्यांना लोक लोहपुरूष असे का संबोधतात व राष्ट्रीय एकता विषयी स्व.सरदार यांचे विचार काय होते याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. यानंतर डॉ.ढाकणे यांनी राष्ट्रीय एकता दिवसाच्या शपथेचे वाचन केले. राष्ट्रगीतानंतर राष्ट्रीय एकता दिवसाची सांगता झाली.

**१.१२ भारतीय संविधान दिनाचे आयोजन**

दि.२६ नोव्हेंबर,२०१७ रोजी संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात **'संविधान प्रास्ताविक वाचन आणि भित्तीपत्रक प्रदर्शन'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## १.१३ बालवीर व वीरबाला प्रशिक्षण शिबिर–

बीपीएड [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ डिसेंबर ते २२ डिसेंबर, २०१७ या कालावधीत पनवेल नजिक 'शांतीवन' येथील निसर्गरम्य परिसरात ६ दिवसांचे स्काऊट व गाईड प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिराला संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर, डॉ.मन्मथ घरोटे व मंडळाच्या कार्यकारी समितीचे सदस्य सर्वश्री रघुनाथ गुरव, श्यामराव मोरे तसेच कुष्ठरोग निवारक समितीचे सचिव श्री. प्रभू देसाई इ. मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांनी केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले.

## १.१४ राष्ट्रीय क्रीडा मानसशास्त्र परिषदेचे आयोजन –

दि.२८ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१७ या कालावधीत भारतीय क्रीडा मानसशास्त्र संघटना [Sports Psychology Association of India] या राष्ट्रीय संघटनेच्या संयुक्त विद्यमाने व केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयाच्या मान्यतेने आणि वित्तीय सहकार्याने 'क्रीडा मानसशास्त्राच्या २१ व्या शतकातील समकालीन समस्या' या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. सदर परिषदेचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू मा.प्रो. देवानंद शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रसिध्द क्रीडा मानसशास्त्रज्ञ डॉ.एम. एल. कमलेश यांनी बीजभाषण केले. समारंभ प्रसंगी अखिल भारतीय क्रीडा मानसशास्त्र संघटनेचे अध्यक्ष व लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थेचे [स्वायत्त विद्यापीठ, ग्वाल्हेर] कुलगुरू प्रो.डॉ.दिलीप दुरेहा, डॉ.अनुराधा सोलंकी [सेक्रेटरी, अ.भा.क्री.मा.] डॉ.ललित शर्मा [दिल्ली] डॉ.के.एस.गुर्जर[ग्वाल्हेर], मिसेस जॉली रॉय, डॉ.ताराशंकर डे [गोवा], डॉ.अनिल रामचंद्रन, डॉ.उषा सिंग [दिल्ली], डॉ.जयश्री आचार्य [ग्वाल्हेर], प्राचार्य डॉ.तुषारकांती बेरा [पुणे], डॉ.मन्मथ घरोटे [लोणावळा], प्रो.डॉ.गौतम गवळी [मुंबई विद्यापीठ], प्रो.डॉ.शेफाली पंडया[मुंबई विद्यापीठ], प्राचार्य डॉ.आर.जी. देशमुख, डॉ.टी.ए. शिवारे [अध्यक्ष, प्राचार्य संघटना], आणि संस्थेचे अध्यक्ष, श्री.संजय शेटे इ. मान्यवर उपस्थित होते. त्याचवेळी मान्यवरांच्या शुभहस्ते परिषदेत करावयाच्या ७४ शास्त्रीय लेखांचा अंतर्भाव असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. परिषदेच्या पहिल्या दिवशी सायंकाळी ६.०० ते ७.३० यावेळेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, टॅब्लो, मल्लखांब, लोकनृत्य, एरोबीक्स, झांज इ. बाबींचा अंतर्भाव असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. त्यावेळी परिषदेत सहभागी झालेल्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

परिषदेच्या तीनही दिवशी दोन स्वतंत्र हॉल्समध्ये तज्ञांद्वारे शास्त्रीय लेखांचे प्रस्तुतीकरण व चर्चा करण्यात आली. तसेच दुस-या दिवशी पोस्टर प्रेझेंटेशन व तज्ञांकडून त्याचे परीक्षण करण्यात आले. परिषदेच्या शेवटच्या दिवशी '२१ व्या शतकातील क्रीडा मानसशास्त्राची वाटचाल' या विषयावर डॉ.एम.एल. कमलेश, डॉ.ललित शर्मा, डॉ.मन्मथ घरोटे, डॉ.रिना कौल, डॉ.अनुराधा सोळंकी, डॉ.टी.के. बेरा इ. मान्यवरांचे 'पॅनल डिस्कशन' होऊन विविध चर्चेच्या अनुशंगाने शिफारशींना ठराव रूपाने मंजूरी देण्यात आली. परिषदेच्या समारोपप्रसंगी मुंबईचे महापौर प्रिं.विश्वनाथ महाडेश्वर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. परिषदेचे प्रमुख आश्रयदाते म्हणून मा.श्री.संजय शेटे, [अध्यक्ष, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ], आयोजन समिती अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर तर आयोजन सचिव म्हणून डॉ.श्रीमती नितु जोशी यांनी प्रमुख भुमिका प्रभावीपणे पार पाडल्या. सदर परिषदेसाठी विविध राज्यातील सुमारे २०० तज्ञांनी भाग घेतला. या परिषदेत महाविद्यालयाच्या एम.पी.एड. व पी.एच.डी. अभ्यासक्रमाच्या खालील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपल्या शोध निबंधाचे प्रस्तुतीकरण केले.

| SR.NO | PRESENTER | TITLE OF THE PAPER |
|---|---|---|
| 1 | Dr.R.R.Dhakne | A Study of Body Mass Index in Relation to Motor Fitness Components of School Going Children Involved in Physical Fitness |
| 2 | Nishant Kolhe<br>Dr.G.K.Dhokrat | A Study of Effect of Football Training Programme on the basis of Stress of Students aged 12 to 14 years of Mumbai City |
| 3 | Sachin Shinde<br>Dr.G.K.Dhokrat | A Comparison of Selected Physical Fitness and Motor Fitness Components of Higher Secondary School boys belonging to Slum and Non Slum Areas of Mumbai District |
| 4 | Dr.Jaysing M. Hotkar | A Brief Review of History of Sports Psychology |
| 5 | Vimala Tiwari,<br>Dr.Neetu Joshi | An Investigation on Anorexia of Students aged 14 to 16 years of Mumbai City |
| 6 | Nikita Salvi,<br>S Phadtare,<br>Dr.Neetu Joshi | Effect of Aerobic Training Programme on Personality of Taekwondo Players aged 12-14 Years |

| | | |
|---|---|---|
| 7 | Dr.R.C.Kawade | Effect of Yoga on Cardiovascular Endurance of Slum Area Girls of Mumbai |
| 8 | Loveena Figueiredo, Dr.S.N.Chougule | A Study of Effect of Football Training Programme on the basis of Agility of Students aged 12 to 14 Years of Mumbai City |
| 9 | Dr.Rajendra Shelke | Survey of Muscular Strength of School Students dwelling in Non-Slum & Slum Areas in Greater Mumbai |
| 10 | Smt. Manisha Samant | Availability of Learning Resources in Sports Psychology |
| 11 | Rajesh Kateshiya (Ph.D) | Effect of Selected Yoga Practices and Relaxation Technique on Selected Psycho-Physical Variables for Army Wing Girls N.C.C. Senior Wing Cadets in Mumbai City |
| 12 | Manoj Verma (Ph.D) | Effect of Pranayama and Mudras on Emotional Stability & Over-All Adjustment of Junior College Students |
| 13 | Sachin Tambare (Ph.D) | Effect of Judo Training on Flexibility |
| 14 | Ramanand Gaikwad (Ph.D) | Utility of Progressive Muscular Stretching and Relaxation Programme for the Promotion of Skill Performance of Volleyball for Boys 13 to 15 Years |
| 15 | Rajesh Shigavan (Ph.D) | Utility of Yoga Training for the Promotion of Health Related Physical Fitness of Intellectually Disabled Students |
| 16 | Sonica Gill (Ph.D) | A Fitterfly School Survey for BMI Values and Classification Using Indian Academy of Paediatrics Standards |
| 17 | Sumit Kamble (Ph.D) | Effect of Progressive Relaxation Training Programme for the Promotion of Motor Coordination and Performance in Football Boys Aged 13 to 15 Years |
| 18 | Swapnil Shetty (Ph.D) | Effect of Specific Training Programme on the Skill Performance of the Basketball Players |
| 19 | Deepak Patil (Ph.D) | Effect of Circuit Training Programmed on Selected Motor Fitness Components and Performance Of School Level Kho-Kho Players Aged 13 to 15 Years |
| 20 | Monica Gill (Ph.D) | A Fitterfly School Survey for $VO_2$ Max Values and Classifications Using Fitness Gram Standards |
| 21 | Siddharth Waghmare (Ph.D) | A Comparative Study of Anxiety and Stress Level of Karate and Taekwondo Players of Mumbai City District aged 12 to 14 Years |
| 22 | Dipali Patil(Ph.D) | Effectiveness of Yogic Mudras Training on Mental Health of Professional Physical Education Female Students |
| 23 | Lalit Dhawde, Nishant Patil | A Comparative Study of Selected Physiological Variables of Male Kabaddi and Kho-Kho Players |
| 24 | Ambrita More, Jagruti Patil (M.P.Ed – II) | Effect of Aerobic Training Programme on Playing Ability of Secondary School Kho-Kho Players |
| 25 | Abhishek Yadav, Snehal Khobarekar (M.P.Ed – II) | A Study of Effect of Football Training Programme on the Basis of Muscular Endurance of Students Aged 12 to 14 Years of Mumbai City |
| 26 | Pratiksha Karkera, Vaishali Gupta, B. Bhilare (M.P.Ed- II) | Effect of Aerobic Training on Stress of School girls aged 12 to 14 years |
| 27 | Swapnali Tambe, Shubhangi Phadtare | A Study of Effect of Football Training Programme on the basis of Cardiovascular endurance of Students aged 12 to 14 years of Mumbai City |

तसेच खालील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले.

| **Groups** | **Presenters** | **Class** | **Topics** |
|---|---|---|---|
| **I** | Rohit Chandan | Delegate Mumbai | Sports Competitive Anxiety and Stress of Football and Volleyball Players aged 14 Years |
| | Shyamsunder Saroj | M.P.Ed - I | |
| | Rajeshkumar Balmiki | M.P.Ed - II | |
| | Krishnapratik Parab | M.P.Ed - II | |
| **II** | Nikita Salvi | Delegate Mumbai | Effect of Aerobic Training Programme on Personality of Taekwondo Players aged 12-14 Years |
| | Shubhangi Phadtare | M.P.Ed - II | |
| | Pradnya Dound | M.P.Ed - I | |
| | Dr.Neetu Joshi | Asst.Prof | |
| **III** | Omkar Chavan | Delegate Mumbai | Effect of Chess Training Programme on General Mental Ability |
| | Dr. R.R.Dhakne | Asst.Prof BPCA | |
| **IV** | Harish Waidande | Delegate Mumbai | Effect of Aerobic Training Programme on the Basis of Aggression of Boxers Aged 14 to 16 Years of Mumbai City |
| | Kiran Thorat | | |
| **V** | Pratiksha Karkera | M.P.Ed - II | Effect of Yogic practices on General Wellbeing of Senior Wing Girls of NCC |
| | Bhagyashri Bhilare | M.P.Ed - II | |
| | Sanjivani Kamble | M.P.Ed - I | |
| | Vaishali Gupta | M.P.Ed - I | |
| **VI** | Ganesh Yadav | M.P.Ed - II | A Comparative Study of Anxiety and Stress Level of Karate and Judo Players of Mumbai City District (III Place) |
| | Anwaruzzama Khan | M.P.Ed - II | |
| | Harshad Mohite | M.P.Ed - II | |
| | Sachin Girane | M.P.Ed - I | |
| | Mayur Chavan | M.P.Ed - I | |
| **VII** | Nishant Kolhe | Delegate Mumbai | Effect of Judo Training Programme on Stress of School Boys aged 12-14 Years |
| | Kalpesh Patel | M.P.Ed - II | |
| | Gayasuddin Balwar | M.P.Ed - II | |
| | Yogesh Bankar | M.P.Ed - I | |
| **VIII** | Anil Pisal | M.P.Ed - II | A Comparative Study of Competitive Sports Anxiety among Football and Volleyball Players |
| | Randhir Bagal | M.P.Ed - I | |
| | Adarsh Kalapurathu | M.P.Ed - I | |
| | Mandar Parab | M.P.Ed - I | |
| | Abhilash Sharma | M.P.Ed - I | |
| **IX** | Atul Shinde | M.P.Ed - I | A Comparative Study of Aggression Between Judo and Wrestling Inter-Collegiate Players of University of Mumbai |
| | Manoj Ghadshi | M.P.Ed – II | |
| | Abhishek Yadav | M.P.Ed – II | |
| | Sunil Yadav | M.P.Ed – I | |
| **X** | Loveena Figueiredo | M.P.Ed – II | Effectiveness of Yogic Exercises on the basis of Psychological Well-being of School boys aged 12 to 14 years of Thane City |
| | Priya Jadhav | M.P.Ed – I | |
| | Ambrita More | M.P.Ed – II | |
| **XI** | Dr.R.R.Dhakne | Asst.Prof BPCA | The Science and Psychology of Motivation for Athletes<br><br>(II Place) |
| | Omkar Chavan | Delegate Mumbai | |
| | Ansel Arakal | M.P.Ed – I | |
| | Royal Dias | M.P.Ed – II | |
| **XII** | Pratiksha Kshirsagar | Ph.D | Effect of Aerobic Exercises On Mental Health of Junior College Girls |
| | Snehal Khule | M.P.Ed – I | |
| | Aishwarya Shinde | M.P.Ed – I | |
| | Madhuri Gaikhe | M.P.Ed – I | |
| **XII** | Dipali Patil | Ph.D | Effect of Pranayama on Anxiety of Professional Physical Education Female Students aged 20 to 25 Years |
| | Manisha Sakharkar | M.P.Ed – II | |
| | Shwetali Kode | M.P.Ed – II | |
| | Sanju Darawade | M.P.Ed – I | |
| | Ajay Dundle | M.P.Ed – I | |

| | | | |
|---|---|---|---|
| **XIII** | Manoj Verma | Ph.D | Effect of Traditional Exercises Training programme on Mental Health of Junior College Boys |
| | Anil Gaganmalle | M.P.Ed - I | |
| | Sachin Girane | M.P.Ed - I | |
| | Bhavesh Gulvi | M.P.Ed - I | |
| **XIV** | Vimala Tiwari | Delegate Mumbai | An Investigation of Social Competence of Students aged 14-16 Years of Mumbai City<br><br>(Ist Place) |
| | Priyesh D'souza | M.P.Ed - I | |
| | Pragati Ramteke | M.P.Ed - II | |
| | Dr.Neetu Joshi | Asst.Prof BPCA | |

**१.१५ आंतर-शालेय हिंद करंडक स्पर्धा [कबड्डी, खो-खो, लंगडी]**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदिखील संस्थेच्यावतीने महाविद्यालयाने घेतलेल्या आंतरशालेय हिंदकरंडक स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्या. दि. १० ते १२ जानेवारी, २०१८ या कालावधीत घेतल्या गेलेल्या कबड्डी, खो-खो व लंगडी या खेळांच्या सदर स्पर्धेत विविध शाळांच्या १३६ संघाच्या १६४२ मुला-मुलींनी [९७२ मुले व ६६० मुली] भाग घेतला होता. सदर स्पर्धेत मुलांच्या ८१ संघांनी [कबड्डी-४५, खो-खो-१६ व लंगडी- २० संघ] तर मुलींच्या ५५ संघांनी [कबड्डी-२१, खो-खो-१३ व लंगडी-२१ संघ] भाग घेतला होता.

**१.१६ आंतर-शालेय लेझीम स्पर्धाः-**

प्रतिवर्षीप्रमाणे मंडळाच्यावतीने कै. दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या आंतर शालेय लेझीम स्पर्धा २९ जानेवारी,२०१८ रोजी झाल्या. त्यात १५ शाळांच्या सुमारे १४५० मुला-मुलींनी भाग घेतला. पहिल्या तीन विजयी शाळांना संस्थेतर्फे रोख बक्षिसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली. शिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या [धारावी] मुख्याध्यापिका मा.सौ.विना दोलवलकर, मुंबई विद्यापीठाचे नवनिर्वाचित सिनेट सदस्य डॉ. वाघमारे, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय बाबूराव शेटे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, मंडळाच्या कार्यकारी समिती सदस्या श्रीमती नलिनी फडणीस, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

**१.१७ मिशन साहसी महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम –**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे प्रसिध्द कमांडो ट्रेनर श्री.शिपू शौर्या यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित "मिशन साहसी" उपक्रमामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी सहभाग घेतला तसेच दि. २२ फेब्रुवारी ते ६ मार्च २०१८ या कालावधीत सदर उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे घेतली. संस्थेच्या मैदानावर इतर महाविद्यालयांच्या विद्यार्थीनींकरीता प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली.

**१.१८ मराठी भाषा गौरव दिन** -

दि. १७ फेब्रुवारी २०१८ रोजी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांनी काव्य वाचन, कविता वाचन केले तसेच **'मराठी भाषा विकास'** यावर व्याख्याने झाली.

**१.१९ उद्‌बोधन शिबिर –**[नवनियुक्त मुंबई विद्यापीठ विद्वत्त परिषद सदस्यांसाठी]

दि.२२ फेब्रुवारी २०१८ रोजी महाविद्यालयाने ए.एन.जी.सी मुंबई विद्यापीठ प्राचार्य संघटना[ANGC], विद्यापीठ विकास मंच यांच्यावतीने नविन महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा व विद्वत्त सभा या प्राधिकरणांच्या कार्यपध्दतीबाबत नवनियुक्त विद्वत्त परिषदेच्या सदस्यासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ.व्यंकटरमणी यांचे अध्यक्षतेखाली उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरास श्री.एम.जी.गोंदा, डॉ.एस.एन.माइंड, श्री. मृदुल निळे श्री.रूपेश मालुसरे, डॉ.संगिता पवार, प्राचार्य व्ही.बी.रोकडे, प्राचार्य डॉ.तुषार देसाई, प्राचार्य डॉ.अनुजा पळसुले देसाई, डॉ.सुभाष वाघमारे, श्री.देवदत्त जोशी, श्री.हृषिकेश पोळ, श्री.नील हेलेकर, प्राचार्य डॉ.धनाजी गुरव व श्री.संजय बाबूराव शेटे इ. मान्यवर हजर होते. त्यावेळी उपस्थितांना श्री.दिपक मुकादम, डॉ.तुकाराम शिवारे व प्रो.व्यंकटरमणी यांनी मौलिक मार्गदर्शन केले तसेच सर्व निवनियुक्त सदस्यांचा महाविद्यालयाच्यावतीने स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला.

## १.२० ॲथलेटिक्स प्रशिक्षण व मैदानी स्पर्धा

बीपीएड अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना दि.३ ते १३ मार्च, २०१८ या कालावधीत विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक धावन मार्गावर ॲथलेटीक्सचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच दि.१६ मार्च २०१७ रोजी बीपीएड द्वितीय वर्षाच्या वार्षिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावेळी उद्‌घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.संजय शेटे उपस्थित होते. सदर स्पर्धेत गुणाधिक्याने संग्राम कुलास [पुरूष गट] व प्रगती व शांती कुलास विभागून विजेतेपद मिळाले तसेच उत्कृष्ठ खेळाडू म्हणून श्री.पडवी दिव्या सुरेश [महिला] व श्री.यशराज अरूण देशमुख [पुरूष] यांनी मान मिळविला.

## १.२१ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ–

दि.२४ मार्च, २०१८ रोजी मुंबई विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे, प्राचार्य डॉ.गो.वि पारगांवकर हे मान्यवर उपस्थित होते.

## १.२२ मुल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन–

अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी Certificate Course In Personal Fitness Training(CCPFT) आणि Certificate Course In Fitness Centre Management (CCFCM) हे अल्पकालिन मुल्यवर्धित अभ्यासक्रम राबविण्यात आले त्यात बीपीएड द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन सदर दोन्ही अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले तसेच अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता कबड्डी, खो-खो, लंगडी व ॲथलेटिक्स या खेळांच्या पंच प्रमाणपत्र परीक्षांचे (Value added programme) आयोजन करण्यात आले.

## १.२३ संशोधन पध्दती कार्यशाळा –

महाविद्यालयाची संशोधनात्मक गुणवत्ता वाढीसाठी एमपीएड व पीएचडी च्या विद्यार्थ्यांसाठी तसेच संशोधन मार्गदर्शक शिक्षकांसाठी प्रो.डॉ.डी.एन. सनसनवाल यांचे मार्गदर्शनाखाली दि.७ मे ते १८ मे २०१८ या कालावधीत संशोधन पध्दती व संख्याशास्त्र या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

## १.२४ विस्तार कार्य

अहवालसाली महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी विविध संस्था आणि शाळांनी आयोजित केलेल्या खालील विविध उपक्रमात पंच / अधिकारी म्हणून भाग घेवून त्याद्वारे त्यांना स्पर्धा / उपक्रम आयोजनाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला----------

१. सुविद्यालय हायस्कूल, [बोरीवली] आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धा– दि.१९ जुलै,२०१७
२. मुंबई उपनगर जिल्हा ॲथलेटिक्स असो. आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा - दि.२ ते ४ ऑगष्ट २०१७.
३. स्टीफन हायस्कूल फॉर डीफ ॲण्ड अफॅसिक स्टुडंटस् आंतरशालेय क्रीडा स्पर्धा– दि.१४ सप्टेंबर २०१७.
४. मुंबई जिल्हा क्रीडा अधिकारी महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित 'मिशन मिलेनियन फुटबॉल' उपक्रमांतर्गत दि.१५ सप्टेंबर २०१७ रोजी मुंबई विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉल स्पर्धा प्रसंगी [आझाद मैदान, विल्सन जिमखाना, ओव्हल मैदान, अंजुमन इस्लाम जिमखाना] महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पंच/अधिकारी म्हणून कार्य केले.
५. मुंबई विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा– दि.११, १२ व १३ नोव्हेंबर,२०१७.
६. नॅशनल उर्दु हायस्कूल वार्षिक क्रीडा स्पर्धा– दि.१५ नोव्हेंबर २०१७
७. मशाल उर्दू व इंग्रजी शाळा, धारावी आयोजन वार्षिक क्रीडा स्पर्धा दि.१५ नोव्हें.,२०१७
८. वाय.एम.सी.ए. द्वारा आयोजित ॲथलेटिक्स स्पर्धा– दि.१५ ते १८ नोव्हेंबर २०१७
९. जी.एस.शेट्टी इंटरनॅशनल स्कूल भांडूप वार्षिक क्रीडा स्पर्धा दि.१८ नोव्हेंबर २०१७
१०. मुंबई स्कूल्स स्पोर्टस असोसिएशनच्या आंतरकुल जिम्नॅस्टिक्स स्पर्धा– दि.१७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१७.
११. श्रीमती कमलादेवी मित्तल कॉलेज,[मालाड] आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा– दि.५ जानेवारी, २०१८.
१२. मुंबई शहर तालीम संघद्वारा आयोजित ग्रीको रोमन राज्य अजिंक्यपद स्पर्धा - दि.१२ व १३ जानोवारी, २०१८.
१३. ५२ वी ज्युनिअर व सिनिअर आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा - दि.२४ व २५ जानेवारी २०१८

१४. २८ वी मुंबई मेअर ट्रॉफी सब ज्युनिअर आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय विजेतेपद स्पर्धा दि.२६, २७ व २८ जानेवारी २०१८
१५. सेंट झेवियर बॉईज ॲकेडमी वार्षिक क्रीडा स्पर्धा- दि.९ फेब्रुवारी २०१८.
१६. जय वकील, स्कूल फॉर चिल्ड्रेन इन नीड ऑफ स्पेशल केअर, शिवडी, मुंबई-३३ द्वारा आयोजित मतिमंद/अपंग मुलांच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा दि.३ फेब्रुवारी,२०१८.
१७. महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ दि.१६ व १७ फेब्रुवारी २०१८.
१८. महाराष्ट्र शासनद्वारा आयोजित राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ दि.१६ व १७ फेब्रुवारी २०१८.
१९. मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशनद्वारा आयोजित टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा- दि.१७ मार्च,२०१८.
२०. मुंबई महापौर व्हॉलीबॉल स्पर्धा दि.५ ते ७ एप्रिल २०१८
२१. साधना विद्यालय, दादर द्वारा आयोजित अपंगांच्या अंध, कर्णबधिर, मतिमंद व अस्थिव्यंग मुलांच्या स्पर्धा, प्रियदर्शिनी पार्क, नेपियन्सी रोड येथे दि.२४ नोव्हेंबर २०१७.
२२. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आयोजित मिशन साहसी अंतर्गत महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण दि.२१ ते २५ फेब्रुवारी २०१८.

## १.२५ शारीरिक शिक्षण संशोधन केंद्राचे कार्य

महाविद्यालयाने पुढाकार घेऊन मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सर्वप्रथम १९९६ साली सुरू केलेल्या शारीरिक शिक्षण व क्रीडा संशोधन केंद्रातून आजपर्यंत एकूण ३८ जणांनी विद्यावाचस्पती [पी.एच.डी.] पदवी प्राप्त केली आहे. सद्या २६ संशोधक पी.एच.डी. पदवीकरीता डॉ. गो.वि. पारगांवकर, डॉ.घ.का. ढोकरट, डॉ. रा.रं. ढाकणे, डॉ. कै.क. आसई, डॉ.किशोर मारू व डॉ.नितु जोशी या सहा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयावर संशोधनाचे काम करीत आहेत. अहवालसाली एका विद्यार्थ्यास [श्री.गोपाळ रे] डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठाची पी.एच.डी पदवी प्राप्त झाली. तसेच तीन विद्यार्थ्यांनी आपले शोधप्रबंध विद्यापीठास सादर केले.

## १.२६ अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia (please specify whether it was a Seminar / Conference/ Symposia as the case may be) | Name of the Organizer | Date & Place | Title of the Paper presented/ read |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. G.V. Pargaonkar Principal | Refresher Couse in Research Methodology in teacher Education | Dept of Education, Savitraibai Phule Pune University | Sept. 2017 | Resource Person |
| | | National Symposium on 'Challenges and Problems of Teacher Education in India' | Kadambini College of Education, Garbhari, Nazir Bazar, Medinipur, West Bangal | February, 02-03, 2018 | Resource Persona |
| | | International Conference on Issues and New Ideas in Sports Management | Vigyan Bhawan, Vishwa Yuvak Kendra, New Delhi. | March, 08-10, 2018 | Resource Person |
| 2 | Dr. R.R. Dhakne Asstt. Prof. | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Effect of Pranayama and Mudras on Emotional Stability and over-all Adjustment of Junior College students |
| 3 | Dr. G.K. Dhokrat Asso. Prof. | International Conference on Physical Education, Fitness and Sports Science 2017 | Osmania University, Hydrabad, Telangana State | August, 19-20, 2017 | Experimental Study on Management of Foot Deformities in School Girls with reference to Yoga |
| | | International Conference on Sports Management 2017 | Ton Due Thang University, Vietnam | Sept, 14-15, 2017 | The role of Sports Management in developing the global sports industry. |
| | | 4th International Conference on Future Prospective of Physical Education, Sport Sciences and Yogic Sciences | Department of Physical Education, S.G.B. Amravati University, Amravati | Dec. 15-16, 2017 | Effect of Yoga Intervention Technique on Positive mental health of School Children carrying Postural |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | Depositaries |
| 4 | Dr. J.M. Hotkar Asstt. Prof. | International Conference on Physical Education, Fitness and Sports Science 2017 | Osmania University, Hydrabad, Telangana State | August, 19-20, 2017 | Participated |
| 5 | Dr. N.O. Joshi Asstt. Prof. | National Level Conference on Current Trends in Physical Education & Yoga | Indira Gandhi (Sr.) College, CIDCO, Nanded | Feb., 16, 2018 | Chair Person |
| | | National Level Conference on Current Trends in Physical Education & Yoga | Indira Gandhi (Sr.) College, CIDCO, Nanded | Feb., 16, 2018 | Resource Person |

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia (please specify whether it was a Seminar / Conference/ Symposia as the case may be) | Name of the Organizer | Date & Place | Title of the Paper presented/ read |
|---|---|---|---|---|---|
| 6 | Smt.. S.N. Chougule Asstt. Prof. | National Symposium 'Towards Formulation of An alternative Democratic Education Policy' | BUCTU, University of Mumbai | June, 17, 2017 | Participated |
| | | National Seminar on Enhancing Employability through Effective Communication & Life skill | M.L. Dahanukar College of Commerce, Department of English | July, 08, 2017 | Dealing with stress at work place. |
| | | 11th Dr. Mani Kamerkar Memorial National Seminar | Sathaye college, | Sept., 23, 2017 | Challenge Paved by Women Gender discrimination of workplace |
| | | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | A Study of Effect of Football Training Programme on the basis of Agility of students aged 12 to 14 years of Mumbai city. |
| | | Multidisciplinary International Conference 'Emerging Issues in Contemporary India: Local and Global Perspectives' | A.E. Kalsekar Degree College | March, 17, 2018 | Effect of Yoga and Aerobics Training Programme for the Promotion of Health Related Physical Fitness of School Girls. |
| 7 | Dr. K.K. Asai Asstt. Prof. | International Conference on Physical Education, Fitness and Sports Science 2017 | Osmania University, Hydrabad, Telangana State | August, 19-20, 2017 | Effect of Karate Training Programme for the promotion of Physical Fitness of School boys. |
| | | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Participated |
| | | International Conference on Contemporary Movements in Sports Tourism, Management, Research, Sports and Yogic Sciences | Ramniranjan Jhunjhunwala College of Arts. Tantric | January, 19-20. 2018 | Effect of Concentric Contracting Exercise Training Recog, Psyc. On selected Anthropometric Measurement and Body Composition of 18 to 20 years male students; |
| 8 | Dr. K.J. Maru Asstt. Prof. | National Workshop on Research Methodology in Social Science | Gokhale Education Society's college of Education and Research, Parel | July-Aug. 31-5, 2017 | Application of SPSS in Social Science Research |
| | | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Effect of Pranayama and Mudras on Emotional Stability and over-all Adjustment of Junior College students |
| 9 | Dr. R.C. Kawade Asstt. Prof. | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Effect of Yoga on Cardio Vascular Endurance of Slum area girls of Mumbai. |
| | | International Conference on Contemporary Movements in Sports Tourism, Management, Research, Sports and Yogic Sciences | Ramniranjan Jhunjhunwala College of Arts. Tantric | January, 19-20. 2018 | Effect of Yoga on Muscular Endurance of Slum Area girls of Mumbai. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | International Conference cum Workshop 'Emerging Trends in Sports Sciencs' | University of Mumbai Dept. of Phy, Edn. & Dhirajlal Talakchand Sankalchand Shah College of Commerce | March 26-28, 2018 | Role of Yoga & Sports |

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia (please specify whether it was a Seminar / Conference/ Symposia as the case may be) | Name of the Organizer | Date & Place | Title of the Paper presented/ read |
|---|---|---|---|---|---|
| 10 | Dr. R.N. Shelke Asstt. Prof. | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Survey of Muscular Strength of School Students dwelling in Non-Slum and Slum areas in Greater Mumbai |
| | | International Conference in Physical Education and Sports Science on Emerging Trends in Fitness and Sports Science | Department of Arts (Phy.Edn.) Manipal University Jaipur | Jan. 05-07, 2018 | A Comparative Study of Body Fat Percentage of the Students Dwelling in non-slum and slum areas in Greater Mumbai |
| | | 28th Mumbai Mayor Trophy Sub-Junior Artistic Gymnastics National Championship 2017-18 | Maharashtra Amateur Gymnastics Association | Jan., 26-28, 2018 | Participation |
| | | State Gymnastics Championship 2017-18 | Maharashtra Amateur Gymnastics Association | Feb., 24-25, 2018 | Participation |
| 11 | Mrs.M.A. Samant Librarian | 28th National Conference of Sports Psychology Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century | B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | Dec. 28-30, 2017 | Availability of Learning Resources in Sports Psychology. |
| | | International Conference on Contemporary Movements in Sports Tourism, Management, Research, Sports and Yogic Sciences | Ramniranjan Jhunjhunwala College of Arts. Tantric | January, 19-20. 2018 | Learning, resources in Fitness and Wellness |

**ब.शिक्षकांद्वारे प्रकाशन कार्य :**

अहवालसाली महाविद्यालयाच्या खालील शिक्षकांनी खालील महत्वपूर्ण लेखन / प्रकाशन कार्य केले.

1 **Dr. G.V. Pargaonkar**

- Authored Book on **'Sports Management'** (As per NCTE B.P.Ed. prescribed syllabus) Friends Publication, India, ISBN No. 978-81-7216-5628, New Delhi, 2017
- Authored Book on **'Sports Psychology'** (As per NCTE B.P.Ed. prescribed syllabus) Friends Publication, India, ISBN No. 978-81-7216-550-5, New Delhi, 2017

2 **Dr. G.K. Dhokrat**

- Experimental Study on Management of Foot Deformities in School Girls : With referee to Yoga" **International Journal of Health, Physical Education & Computer Science in Sports, ISSN 2231-3265, Vol.-27 No. 2, Quarterly (July to Sept 2017)**
- Comparison of Selected Motor Fitness Components of Girl Students Dwelling in non slum and slum areas in Thane District " **Scholarly Research Journal for Humanity Science & English Language, ISSN 2348-3083, SJ Impact Factor 2016**
- A Study of Effect of Football Training Programme on the Basis of Stress of Students Aged 12 to 14 Years of Mumbai City " **Contemporary Issues of Sports Psychology in the 21st Century, ISBN-978-93-5291-8799.**
- A Comparative study of Selected Physical Fitness Components of Higher Secondary School Children Belonging to Non Slum And Slum Areas in Mumbai District " **Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, online ISSN 2278-8808,/SJIF 2016=6.17**

3 **Dr. J.M. Hotkar**

- Yoga-a Perfect Strength Developmental Remedy for Seniors", **Entire Research, ISSN 0975-5020, January, 2018**
- A Brief Review of History of Sports Psychology" **ISBN 978-93-5291-879-9, January, 2018**

4 **Dr. K.K. Asai**

- Effect of Karate Training Programme for the Promotion of Physical Fitness of School Boys", **International Journal of Health, Physical Education and Computer Science in Sports, Vol. No. 27, ISSN 2231-3265, July-Sept, 2017**
- Effect of Eccentric and Concentric Contraction Exercise Training Programme on selected Anthropometric Measurements and Body Composition of 18 to 20 Years Male Students " **Entire Research, , ISSN-0975-5020, January. 2018**

5 **Dr. K.J. Maru**

- Effect of Pranayama and Mudras on Emotional Stability & Over-all Adjustment of Junior College Students", **ISBN No. 978-93-5291-879-9**

6 **Dr. R.C. Kawade**

- Effect of Yoga on Cardiovascular Endurance of Slum Area Girls of Mumbai ", **ISBN No. 978-93-5291-879-9**
- Role of Yoga in Sports", **Shodh Sangam Special Issue: ISSN 2249-717X, March**, 2018
- Effect of Yoga on Muscular Endurance of Slum Area Girls of Mumbai", **Entire Research, Vol-X, Issue-II : ISSN0975-5020, April**, 2018

7 **Dr. R.N. Shelke**

- Survey of Muscular Strength of School Students Dwelling in Non-Slum and Slum reas in Greater Mumbai", **ISBN:978-93-5291-879-9**

## क. शिक्षकांचे विशेष कार्य

**1 Dr. G.V.. Pargaonkar**

- Worked as ***IQAC Member*** of Dr. Amberdkar College of Commerce and Economics, Wadala, Mumbai – 31.
- Worked as ***Member (Subject Expert) on Research and Recognition Committee*** for the subject of Physical Education under the faculty of Inter-disciplinary studies of Savitribai Phule Pune University and University of Mumbai.
- Worked ***on LIC of Continuation of recognition of Ph.D. degree in the subject of Education*** of G.E.S. college of Education, Parel, appointed by the University of Mumbai.
- Worked ***on scruting /committee*** of ***University of Mumbai for Minor Research Project.***

**2 Dr. G.K. Dhokrat**

- Worked as ***Convener in accommodation & Transport committee of 28th National Conference of Sports Psychology organized*** by B.P.C.A.'s College of Physical Education
- Worked as ***as Technical Official in 22nd senior Greeko Roman State Level Wrestling Competition*** org. by Mumbai Shahar Talim Sangh Mumbai.
- Worked as ***Technical Official in 28th Mumbai Mayor Trophy Sub-Junior Artistic Gymnastics national Championship 2017-18***

**3 Dr. N.O. Joshi**

- Worked as ***Examiner at L.N.I.P.E., Gwalior***
- Worked as ***Official in 28th Mumbai Mayor Trophy Sub-Junior Artistic Gymnastics national Championship 2017-18***

**4 Dr. K.K. Asai**

- Worked as ***an Offical of 28th Mumbai Mayor Trophy Sub-Junior Artistic Gymnastics national Championship 2017-18***
- Worked as ***a "Organizing committee Member, International Conference on Contemporary Movements in Sports Tourism, Management Research, sports and Yogic Science*** organized by

Ramnirajan Jhunjhunwala college, Ghatkopar.

- Worked as ***an Examiner and Moderator*** of University of Mumbai for the Program of A6513/B.P.Ed. Sem.III CBSGS 2 Years
- Worked as ***an Examiner of Bharati Vidyapeeth University,*** Pune, for the M.P.Ed. Programme.
- Worked as ***an Examiner of Bharati Vidyapeeth University,*** Pune, for the B.P.Ed. Programme

**5 Dr. K.J. Maru**

- Invited ***Technical Official in 28th Mumbai Mayor Trophy Sub-Junior Artistic Gymnastics national Championship 2017-18***
- Worked ***as Technical Official in 22nd senior Greeko Roman State Level Wrestling Competition*** org. by Mumbai Shahar Talim Sangh Mumbai.
- Worked ***as Joint Organizing Secretaries of 28th National Conference of Sports Psychology*** organized by B.P.C.A.'s College of Physical Education, Wadala, Mumbai-31.

**6 Dr. R.C. Kawade**

- Worked ***as Examiner in Inter School Lezium Competition*** at Raja Shivaji Vidyamandir, Thane

**7 Dr. R.N. Shelke**

- Worked ***in Organizational Setup of State level Greco-Roman Wrestling Competition.***

## १.२७ आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेतील विद्यार्थी सहभाग

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आंतर-महाविद्यालयीन राज्य, राष्ट्रीय व आंतर-विद्यापीठीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेवून उल्लेखनीय कामगिरी केली-

### अ. <u>वैयक्तिक कामगिरी</u>

- **धनुर्विद्या**

१. जगन्नाथ शेटकर **[बीपीएड - प्रथम वर्ष]**
दि.२६ डिसेंबर २०१७ रोजी ओरिसा येथे झालेल्या आंतर-विद्यापीठ स्पर्धेत सहभाग व आंतर महाविद्यालयीन तिसरा क्रमांक.

- **जिम्नॅस्टिक्स**

१. तन्मय घाणेकर **[बीपीएड - द्वितीय वर्ष]**
दि.२३ ते २४ सप्टेंबर २०१७ रोजी नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत प्रथम क्रमांक.

- **बॉक्सींग**

१. वर्मा आंनदकुमार **[बीपीएड - द्वितीय वर्ष]**
दि.२ नोव्हेंबर २०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत तिसरा क्रमांक तसेच राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धेत सहभाग.

- **ॲथलेटिक्स**

१. /समिक्षा कोरे **[बीपीएड - प्रथम वर्ष]**
दि.१० ते १२ नोव्हेंबर,२०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X १०० मिटर रिले स्पर्धेत तिसरा क्रमांक व सॉप्टबॉल व बेसबॉल आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग.

२. /जाधव अपर्णा **[बीपीएड - प्रथम वर्ष]**
दि.१० ते १२ नोव्हेंबर,२०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X ४०० मिटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच ४ X १०० मिटर रिले स्पर्धेत तृतीय क्रमांक व हॅण्डबॉल व बेसबॉल स्पर्धेत सहभाग.

३. /दिपाली कळमकर **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.१० ते १२ नोव्हेंबर,२०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X ४०० मिटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच पाच किलो मीटर चालण्याच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत पाचवे स्थान.

४. /श्वेताली नर **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.१० ते १२ नोव्हेंबर,२०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन
क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X ४०० मिटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच ४ X १०० मिटर रिले स्पर्धेत तृतीय क्रमांक व कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत चतुर्थ क्रमांक.

५. /रेशमा सुर्वे **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.१० ते १२ नोव्हेंबर,२०१७ रोजी मरीन लाईन्स पॅव्हीलियन क्रीडा विभाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X ४०० मिटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच ४ X १०० मिटर रिले स्पर्धेत तृतीय क्रमांक व क्रॉसकंट्री आंतर महाविद्यायीन स्पर्धेत चतुर्थ क्रमांक

- **कुस्ती**

१. /दिपाली बलखंडे **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.२४ ऑक्टोंबर २०१७ रोजी के.एम.सी. महाविद्यालय खोपोली येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन, द्वितीय क्रमांक तसेच आर.डी. नॅशनल महाविद्यालयीन वांद्रे मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धेत सहवा क्रमांक. तसेच नागपरू येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सहभाग.

- **कुस्ती, सॉप्टबॉल, बेसबॉल, हॅण्डबॉल**

१. /समृध्दी पवार**[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.२४ ऑक्टोबर २०१७ रोजी के.एम.सी. महाविद्यालय खोपोली येथील आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक तसेच आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल, बेसबॉल स्पर्धेत सातवा क्रमांक, हॅण्डबॉल व रस्सीखेच स्पर्धेत अनुक्रमे पाचावा व आठवा क्रमांक,

- **क्रिकेट व सॉप्टबॉल**

१. /प्रियांका मेहेर **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत गोल्ड मेडल तसेच आंतर विद्यापीठ क्रीकेट स्पर्धेत उत्तर प्रदेश येथे झालेल्या स्पर्धेत तृतीय क्रमांक तसेच आंतर विद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग तसेच बेसबॉल आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सातवे स्थान

- **तायक्वांडो**

१. /पुजा चतुर्वेदी **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.१ फेब्रुवारी २०१८ रोजी मरीन लाईन्स क्रीडा विभाग मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत द्वितीय क्रमांक तसेच दि.२९ ऑगष्ट २०१७ रोजी अे.एस.सी. कल्याण महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्र स्पर्धेत चतुर्थ क्रमांक. तसेच आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत पाचवे स्थान.

२. /छाया सरगर**[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.१ फेब्रुवारी २०१८ रोजी मरीन लाईन्स क्रीडा विभाग मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

- **रस्सीखेच**

१. /पुजा कुडू **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
दि.२३ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१८ रोजी किर्ती महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत आठवा क्रमांक तसेच दि.२३

जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१८ रोजी अमृतसर येथे झालेल्या आंतर महाविद्यापीठ रस्सीखेच स्पर्धेत सहभाग. तसेच आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत पाचवे स्थान.

- **तलवारबाजी– ईपी**

१. /स्नेहल खुळे **[एमपीएड – प्रथम वर्ष]**
दि.५ जानेवारी २०१८ रोजी सोफीया महाविद्यालय, मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन तलवार बाजी स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक तसेच आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग

## ब. <u>सांघिक कामगिरी</u>

- **बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**

दि.१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०१८ रोजी झालेल्या ४ X ४०० मिटर रिले – आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत तृतीय क्रमांक

१. /जाधव अपर्णा
२. /नर श्वेताली
३. /कोरे समिक्षा
४. /सुर्वे रेशमा

- **४ X १०० मिटर रिले – आंतर महाविद्यालयीन, तृतीय क्रमांक**

१. /जाधव अपर्णा
२. /नर श्वेताली
३. /कलमेटकर दिपाली
४. /सुर्वे रेशमा

## क. इतर सांघिक कामगिरी

- दि.२३ सप्टेंबर २०१७ रोजी आर डी नॅशनल महाविद्यालय वांद्रे मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धेत पुरूषगट पाचवा क्रमांक आणि महिला गट सहावा क्रमांक.

| **पुरूषगट पाचवा क्रमांक** | **महिलागट सहावा क्रमांक** |
|---|---|
| १.स्वप्नील शिंदे | १./दिपाली बलखंडे |
| २.ओमकार बोडके | २./अंधारी यशश्री |
| ३.राहूलकुमार यादव | ३./मयुरी दिघे |
| ४.मोहम्मद अंसारी | ४./समृध्दी पवार |
| ५.प्रनेश साळूंखे | ५./प्रियांका मेहेर |
| | ६./रेशमा सुर्वे |

- **हॅण्डबॉल**

दि.४ ऑक्टोंबर २०१७ रोजी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत महिलागट, पाचवा क्रमांक

- **सॉप्टबॉल**

दि.१५ जानेवारी २०१८ रोजी मुंबई विद्यापीठ कलीना कॅम्पस येथे झालेल्या सॉप्टबॉल स्पर्धेत महिलागट सातवा क्रमांक

- **बेसबॉल**
- दि.१७ जानेवारी २०१८ रोजी मुंबई विद्यापीठ कलीना कॅम्पस येथे झालेल्या सॉप्टबॉल स्पर्धेत महिलागट सातवा क्रमांक

- **असेंडिंग आणि डिसेंडिंग**

दि.१७ फेब्रुवारी २०१८ रोजी आंबेडकर कॉलेज महड रायगड येथे झालेल्या असेंडिंग आणि डिसेंडिंग आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत पुरूषगट सहावा क्रमांक

- **टग ऑफ वॉर**

दि.२० जानेवारी २०१८ रोजी किर्ती महाविद्यालय मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत महिला व पुरूष संघास आठवा क्रमांक.

- **क्रॉसकंट्री**
  दि.२९ ऑगष्ट २०१७ रोजी के.एस.सी. बिर्ला महाविद्यालय कल्याण येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत महिलासंघास चतुर्थ क्रमांक.

**ड. <u>इतर सहभाग</u>**

- आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.

अहवालसाली महाविद्यालयातील एकूण ६४ विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध खेळातील वैशिष्टयपूर्ण कामगिरीबद्दल विद्यापीठीय नियम ०.२२६ नुसार त्यांना जास्तीचे १० गुण मिळण्यास पात्र ठरले.

**१.२८ गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत/शिष्यवृत्ती**

१. **मराठा भगिनी समाज शिष्यवृत्ती-** दि.२६ जानेवारी २०१८ रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय शेटे यांचे शुभहस्ते महाविद्यालयाच्या खालील पाच विद्यार्थीनीस प्रत्येकी रू.२,०००/-[रूपये दोन हजार फक्त] इतकी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आली-

१. श्रीमती प्रियांका चिंतामण मेहेर
२. श्रीमती मनिषा कैलास सुर्यवंशी
३. श्रीमती हेमांगी कापुरे
४. श्रीमती दिपाली बलखंडे
५. श्रीमती समिक्षा कोरे

**१.२९ कॅम्पस मुलाखती**

अहवालसाली विद्यार्थ्यांना विविध शाळा/ संस्थामध्ये क्रीडा शिक्षकाची नोकरी उपलब्ध व्हावी यासाठी दि.१४ मे २०१८ रोजी महाविद्यालयाने खालील विविध कंपन्या/ संस्थाद्वारे कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले-

1. Mr. Azeem Durrani,
   Academic Director
   Moonstar Global School,
   Next to Tanwar Nagar TMC Gate,
   Kausa, Mumbra, Thane – 400 612
   Tel. No: 022 25355558
   Email.id: knoworld@gmail.com

2. Mr.Sanket Shette,
   Unistar Sports,
   Unistar Sporting Excellence Pvt Ltd,
   108, Prithvivandan CHS, Lower Parel €, Mumbai – 400 013
   Tel.No: 9664766472
   Email.id: sanket.shetye@unistarsports.com

3. Suffah English School,
   Plot.No.7, 3rd Sant Savta Lane,
   Near Balaji Hospital, Mustafa Bazar, Byculla (E), Mumbai – 400 027
   Tel. No: 65155570 / 5

4. Mr.Manish Chotrani & Dr.Meera Chotrani
   Champs,
   Scientific Fitness training For Athletes & Sports Enthusiasts,
   16/128 Anand Nagar, Vakola Police Station Road,
   Off WE Highway, Santacruz East,
   Mumbai – 400 055
   Tel.No: 022 26680014

5. Mrs.Amruta Karkhanis,
   D.S.High School,
   Next to Guru Nank High School,
   Sion, Mumbai
   Mob.No: 9820590484

6. Ms.Kausar Fruitwala,
   Principal,
   Niyaz National School,
   Ouchit Pada, Bhiwandi

7. Mr.Sanjay Patil & Mr.Pankaj Mali,
   Marcos Quay Sporting Excellence Pvt Ltd,
   Pace House, 5th Floor, JVPD road.no.1,
   7 Swastika Society, Vile Parle (W),
   Mumbai – 400 056

## १.३१ माजी विद्यार्थी संघटनेचे कार्य

वर्षभरात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे केलेले कार्य कौतुकास्पद आहे. संघटनेच्या कार्यकारी समितीच्या व सर्वसाधारण सभा वेळोवेळी होवून त्यांच्यात विचारांची देवाण घेवाण झाली. माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने १९९३ सालापासून चालविण्यात येणा-या नियमित क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ यावर्षी सुमारे २०० शालेय मुला-मुलींनी घेतला. आजवर प्रतिवर्षी विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन या शालेय मुलामुलींना घवघवीत यश संपादन केले आहे. क्रीडा केंद्राने २० खेळाडूंनी राज्य तर १५ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरापर्यंत नेण्याची मजल गाठली. सदर प्रशिक्षण केद्रांत प्रामुख्याने सर्वश्री दादासाहेब शिंदे, राजेंद्र शेळके, देवेंद्र पाटील, प्रेमानंद नाईक व संदीप चव्हाण हे माजी विद्यार्थी आपला अमुल्य वेळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली कौतुकास्पद कामगिरी करीत आहेत.

## १.३२ विद्यापीठ परीक्षा निकाल

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात झालेल्या मुंबई विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा [२०१५-१७] निकाल १००% लागला. सदर परीक्षेस महाविद्यालयाचे एकूण ७२ विद्यार्थी बसले होते. तसेच एम.पी.एड. [२०१५-२०१७] [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमासाठी बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला. सदर परीक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रीमती जुई दादरकर हिने बी.पी.एड. तर एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या परीक्षेत श्रीमती विमला तिवारी हिने मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला.

तात्पर्य, दिवसेंदिवस मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा उंचावत आहे. आजवर मंडळाच्या या महाविद्यालयातून तयार झालेले सुमारे ३,५०० शिक्षक देशाच्या कानाकोप-यात अनेकविध शाळा-महाविद्यालयातून यशस्वीरित्या कार्य करीत आहे. आज १०० टक्के विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने व प्राधान्याने नोक-या मिळताहेत यावरून महाविद्यालयाची गुणवत्ता सिध्द होते. ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भुषणावह व अभिमानास्पद आहे.

## १.३३ वार्षिक पारितोषिक वितरण व दीक्षांत समारंभ –

दि.२५ एप्रिल २०१८ रोजी मुंबईचे महापौर मा.प्राचार्य श्री.विश्वनाथ महाडेश्वर यांचे प्रमुख उपस्थितीत व मा.संजय शेटे [अध्यक्ष, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ] यांचे अध्यक्षतेखाली वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, लोकनृत्य, जिम्नॅटिक्स, एरोबिक्स, टॅब्लो, झांज इ. शारीरिक व सांस्कृतिक बाबींची नेत्रदिपक प्रात्यक्षिके दाखविली तसेच मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. सदर समारंभास विशेष अतिथी म्हणून डॉ.सुनिल पाटील [संचालक, विद्यार्थी विकास मंडळ मुंबई विद्यापीठ], मा.श्री. अमेय घोले [स्थानिक नगरसेवक], मा.श्री.एन.बी.मोटे [उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा मुंबई विभाग], मा.श्री.राजेंद्र वराडकर [सचिव, स्वातंत्रवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक], प्राचार्य डॉ. शिरहट्टी, संस्थेचे अध्यक्ष मा.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे व कार्यकारी समिती सदस्य श्रीमती नलिनी फडणीस, श्री.शामराव मोरे, श्री.रघुनाथराव गुरव इ.मान्यवर तसेच

क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी-पालक आणि माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. समारंभात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व मुंबईचे महापौर मा.श्री.विश्वनाथ महाडेश्वर यांना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी क्रीडा क्षेत्रात वैयक्तिक व सांघिक विशेष कामगिरी केलेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना तसेच बीपीएड, एमपीएड अभ्यासक्रमाच्या वर्षभरात झालेल्या आंतरकुल व मैदानी स्पर्धेमध्ये विजयी व उपविजयी पुरूष व महिला कुलास चषक देवून आणि क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत विशेष कामगिरी करणा-या खेळाडूंना रोख बक्षिसे व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच या समारंभाचे औचित्य साधुन मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर पदवीधर मतदार संघात निवडून आलेल्या मा.सर्वश्री प्रदीप सावंत, महादेव जगताप, राजन कोळंबेकर, धनराज कोहचाड व श्रीमती शितल शेठ देवरूखकर या मान्यवरांचा मा.महापौरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

मुंबई विद्यापीठाच्या सेमिस्टर परीक्षेच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि.२५ मे २०१८ रोजी बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन शारीरिक शिक्षण क्षेत्रात निष्ठेने कार्य करण्याचा संकल्प केला. सदर समारंभास संस्थेचे अध्यक्ष मा.संजय शेटे, सातारा सहकारी बॅकेचे अध्यक्ष मा.भाई वांगडे इ. मान्यवर उपस्थित होते.

## २. क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे कार्य

अहवालसाली संस्थेच्या क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या २४ व्या वर्षी [सन२०१७-१८] आयोजित केलेल्या विविध उपक्रमांबाबत तसेच विविध स्पर्धांमध्ये भाग घेवून खेळाडूंनी दाखविलेल्या कामगिरीचा थोडक्यात अहवाल पुढीलप्रमाणे-

### २.१ २४ वे वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिर

दि.१३ एप्रिल ते २८ एप्रिल २०१७ या कालावधित आयोजित केलेल्या २४ व्या वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिरात जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब आणि योग या क्रीडा प्रकारांमध्ये एकूण १३८ शालेय व महाविद्यालयातील मुला-मुलींनी सहभाग घेतला.

संचालक डॉ.गो. वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर प्रमुख श्री. दादासाहेब शिंदे, श्री.देवेंद्र पाटील, श्री.फिरोज बेळगांवकर, श्री.प्रेमानंद नाईक, श्री. राजेंद्र शेळके, संदिप चव्हाण व कु.अंजली देशमुख यांनी शिबिरार्थींना प्रशिक्षण दिले. शिबिराचा समारोप समारंभ दि.२८ एप्रिल,२०१७ रोजी सायंकाळी ६.३० वा. मंडळाचे कार्यवाह मा.श्री.दिपक शेटे व प्रभारी प्राचार्य डॉ.आर.आर.ढाकणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उत्कृष्ठ शिबिरार्थींना प्रशस्तीपत्र व बक्षिसे देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

### २.२ प्रगत प्रशिक्षण शिबिर

दि. १ मे ते ३० मे,२०१७ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० व सायंकाळी ६ ते ९ या वेळेत प्रगत वासंतिक प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले. यामध्ये आर्टिस्टिक्स व ॲक्रोबेटिक्स जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण श्री.फिरोज बेळगांवकर, श्रीमती अंजली देशमुख, श्री.तन्मय घाणेकर, कु.शिवानी दौंड यांनी दिले. श्री.दादासाहेब शिंदे यांनी समन्वयक म्हणून कार्य केले.

### २.३ नियमित क्रीडा प्रशिक्षण

दि.१२ जून,२०१७ पासून संस्थेच्या नियमित क्रीडा प्रशिक्षण केंद्राची सुरूवात होऊन वर्षभरात त्यामध्ये एकूण १५० शालेय मुला मुलींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे व डॉ.गो.वि. पारगांवकर[संचालक, क्रीडा प्रशिक्षण केंद्र] यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.दादासाहेब शिंदे, श्री.देवेंद्र पाटील, श्री.फिरोज बेळगांवकर, श्री.राजेंद्र शेळके, श्री.संदीप चव्हाण, श्री.प्रेमानंद नाईक, कु.अंजली देशमुख व विशेषत: रिदमिक जिम्नॅस्टिक्सची आंतरराष्ट्रीय खेळाडू व पंच कु.अक्षता शेटे यांनी प्रशिक्षणाचे महत्वपूर्ण कार्य केले.

### २.४ मुंबई शहर शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.३ ऑक्टोंबर,२०१७ रोजी श्री समर्थ व्यायाम मंदिर येथे मुंबई शहर शालेय आर्टिस्टीक्स व ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये संस्थेतील १६ खेळाडूंनी त्यांच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे सहभाग घेतला. त्यामधून पुढील खेळाडूंची विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली--

१. आदित्य फडणीस
२. वेदांगी खैरे
३. वेदांत देशमुख
४. दामिनी शिरोडकर
५. तोशिनी राजे
६. वेदांग सरदार
७. साईराज पवार
८. अनुश्री कदम
९. साक्षी पवार

## २.५ मुंबई विभाग शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि. २८ ऑक्टोंबर व ३० ऑक्टोंबर २०१७ रोजी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले व राजीव गांधी क्रीडा संकुल, धारावी येथे संपन्न झालेल्या विभागीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत कु.आदित्य फडणीस याने सर्वसाधारण सुवर्णपदक पटकाविले. राज्य शालेय स्पर्धेकरीता खालील खेळाडूंची निवड झाली--

१. आदित्य फडणीस - सर्वसाधारण सुवर्ण पदक
२. वेदांगी खैरे
३. वेदांग सरदार
४. साईराज पवार
५. अनुश्री कदम
६. साक्षी पवार

## २.६ शालेय राज्य अजिंक्यपद जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.३१ ऑक्टोंबर ते ४ नोव्हेंबर २०१७ रोजी विभागीय क्रीडा संकुल, औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत संस्थेच्या पुढील खेळाडूंनी चांगली कामगिरी केली-

१. आदित्य फडणीस- सर्वसाधारण -सुवर्ण
सांघिक - सुवर्ण
पोमेल हॉर्स - रौप्य
हॉरीझन्टल बार-कांस्य
२. वेदांगी खैरे - सांघिक - सुवर्ण
३. वेदांग सरदार, साईराज पवार - कांस्य

## २.७ ६३ वी राष्ट्रीय शालेय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा

दि.१४ ते १८ नोव्हेंबर २०१७ रोजी कलकत्ता, पश्चिम बंगाल येथे झालेल्या ६३ व्या राष्ट्रीय शोलय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कु.आदित्य फडणीस याने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करून सांघिक रौप्य व पॅरलल बार्स-रौप्य पदक पटकाविले.

## २.८ मुंबई शहर जिल्हा जिम्नॅस्टिक्स निवड स्पर्धा

दि.१० सप्टेंबर, ३० नोव्हेंबर, १३, १४ डिसेंबर २०१७ व २० जानेवारी २०१८ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा व राजीव गांधी क्रीडा संकुल, धारावी येथे संपन्न झालेल्या आर्टिस्टिक, ॲक्रोबॅटिक्स, ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग प्रकारात निवड स्पर्धेत मंडळाच्या एकूण ४९ खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यापैकी ४४ खेळाडूंची मुंबई शहर जिल्हा संघात राज्य अजिंक्यपद जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड झाली.

## २.९ २३ वी ॲक्रोबेटिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा

दि. २२ ते २४ सप्टेंबर, २०१७ रोजी गुरू गोविंदसिंगजी स्टेडियम, नांदेड येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद ॲक्रोबॅटिक्स स्पर्धेत संस्थेच्या ११ खेळाडूंनी मुंबई शहराचे प्रतिनिधीत्व करून खालीलप्रमाणे उत्कृष्ठ कामगीरी केली--

- **पुरूष सिनिअर गट**

१.तन्मय घाणेकर }
२.शिवानी दौंड } मिक्स दुहेरी- सुवर्ण

- **महिला सिनिअर गट**

१.शिवानी दौंड }
२.रिध्दी वीरा } मिक्स ग्रुप - कांस्य
३.साक्षी पवार }

- **पुरूष ज्युनिअर गट**

१. वेदांग सरदार }
२.पंकज सावंत } पुरूष ग्रुप - कांस्य
३.यश परदेशी }
४.नित्यानंद शेट्टी }

१.वेदांग सरदार }
२साईराज पवार } पुरूष दुहेरी - कांस्य

१. यश परदेशी }
२. अनुश्री कदम } मिक्स दुहेरी- कांस्य

**२.१० ५२ वी आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा**

दि.२२ ते २४ डिसेंबर,२०१७ रोजी श्रवण स्पोर्टस सेंटर, डोंबिवली व दि.२४ ते २५ जानेवारी २०१८ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मंडळाच्या १४ खेळाडूंनी मुंबई शहरचे प्रतिनिधीत्व करून खालीलप्रमाणे उत्कृष्ठ कामगीरी केली---

१. कु.वेदांगी खैरे- १२ वर्षाखालील मुली- अनईव्हन बार्स- सुवर्ण
- टेबल व्हॉल्ट, सर्वसाधारण - रौप्य
- बॅलसिंग बीम, सांघिक - कांस्य

२. कु.आदित्य फडणीस- १४ वर्षाखालील मुले- पोमेल हॉर्स - कांस्य

या स्पर्धेमध्ये संस्थेचे प्रशिक्षक श्री.दादासाहेब शिंदे, श्री.राजेंद्र शेळके, श्री.देवेंद्र पाटील, श्री.प्रेमानंद नाईक, श्री.फिरोज बेळगांवकर व कु.अक्षता शेटे व कु.अंजली देशमुख यांनी पंच कार्य केले व आयोजनात बहुमोल कार्य केले.

**२.११ १३ वी ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा**

दि.२४ व २५ फेब्रुवारी २०१८ रोजी 'डोंबिवली' येथे झालेल्या १२ व्या ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेच्या खालील ७ खेळाडूंनी मंबई शहराचे प्रतिनिधित्व करून पुढीलप्रमाणे उत्कृष्ठ कामगिरी केली----

१.कु.शिवानी दौंड-सिनिअर मुली- ट्रॅम्पोलिन-सुवर्ण
२.कु.रिध्दी हरीया-सिनिअर मुली-ट्रॅम्पोलिन-कांस्य
३.कु.पंकज सावंत- सबज्युनिअर गट मुले- ट्रॅम्पोलिन- रौप्य
४.कु.साईराज पवार- सबज्युनिअर गट मुले, सांघिक- ट्रॅम्पोलिन- रौप्य
५.कु.वेदांत देशमुख - सबज्युनिअर गट मुले- ट्रॅम्पोलिन- रौप्य
६.कु.अनुश्री कदम- सबज्युनिअर गट मुली- ट्रॅम्पोलिन- रौप्य
७.कु.गार्गी पै - सबज्युनिअर गट मुले, सांघिक- ट्रॅम्पोलिन- रौप्य

**२.१२ ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा.**

दि.२७ मार्च,२०१८ रोजी सुरत, गुजरात येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेच्या खालील खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनित्व करून चांगली कामगिरी केली--

१. शिवानी दौंड- १७ वर्षाखालील मुली- ट्रॅम्पोलिन - सुवर्ण
२. ॠतुजा ढेकळे - १७ वर्षाखालील मुली- ट्रॅम्पोलिन - कांस्य

**२.१३ चौथी एशियन ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा**

दि.१८ व २० मे २०१८ रोजी फिलीपाईन्स, मनिला येथे झालेल्या स्पर्धेत संस्थेच्या शिवानी दौंड हिने भारताचे प्रतिनिधीत्व करून सुवर्ण पदक पटकाविले.

**२.१४ सातवा आंतरराष्ट्रीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स इमरॅल्डस् कप**

दि.६ ते ८ ऑक्टोंबर २०१७ रोजी थेसालोन्की, ग्रीस येथे झालेल्या स्पर्धेत मंडळाच्या रिदमिक जिम्नास्टस्नी रशिया, ग्रीस, बल्गेरिया, इजिप्त, ग्रीब्लॅटर व स्वीडन या देशाबरोबर सहभाग घेवून चांगली कामगीरी केली. या स्पर्धेत प्रथम तीन

क्रमांकाना प्राविण्य प्रमाणपत्र व पदके प्रदान करण्यात आली व ४ ते ८ क्रमांकांना प्राविण्य प्रमाणपत्र देण्यात आली. संस्थेच्या खेळाडूंची कामगिरी पुढीलप्रमाणे--

- **ग्रुप ब - २००७ बालगट**

१.समृध्दी घोष - बॉल- सुवर्ण, सर्वसाधारण- रौप्य, फ्री हॅण्ड - कांस्य

- **ग्रुप ब - २००५ प्री.ज्युनियर**

२.क्रीशी जैन- हूप, बॉल, क्लब, सर्वसाधारण- पाचवी

- **२००३ ज्युनिअर**

३.मैथिली कावकी }सहभाग
४.क्षितिजा वाघमारे }

- **२००४ ज्युनिअर**

५.प्रिशा धरमसी - बॉल - सहावी, हुप, क्लब- आठवी
६.भुमिका ढोणे - रिबन-सहावी, बॉल-सातवी, हुप- आठवी
७.विनया करंगुटकर-रिबन - पाचवी, बॉल-आठवी

- **सिनिअर गट**

८.निहारिका लखोटे- रिबन - आठवी
९.योगेश्वरी मिस्त्री- सहभाग

- **ज्युनिअर गट**

१०.मैथिली कावकी }
११.क्षितिजा वाघमारे }
१२.भूमिका ढोणे } सुवर्ण
१३.विनया करंगुटकर }
१४.प्रिशा धरमशी }

**२.१५ २८ वी रिदमिक जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा**

दि.१३ व १४ जानेवारी २०१८ रोजी 'ठाणे' येथे झालेल्या २८ व्या रिदमिक जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धेत कु.वनेसा ठाकर हिने सांघिक- सुवर्ण व क्लब- रौप्य पदक पटकाविले.

**२.१६ पहिली लेवल स्पर्धा, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश**

दि.२८ व ३० मार्च २०१८ रोजी स्टॅग प्रो एम लीग व एल.एन.सी.पी.ई. ग्वाल्हेर येथे आयोजित स्पर्धेत मंडळाच्या खेळाडूंनी सहभाग घेवून चांगली कामगीरी केली. या स्पर्धेला प्रशिक्षिका कु.अक्षता शेटे व सौ.सोनाली सावंत यांनी मुलींना प्रोत्साहित केले. या स्पर्धेत संस्थेच्या खेळाडूंनी केलेली कामगिरी पुढीलप्रमाणे--

- **लेवल - एक**

१.तनिशी चंदन - फ्री हॅन्ड-सुवर्ण, रोप-कांस्य, सर्वसाधारण-रौप्य

- **लेवल - दोन**

२.वनेसा ठाकर- बॉल, क्लब्ज-सुवर्ण, सांघिक- सुवर्ण,
सर्वसाधारण - रौप्य फ्री हॅण्ड-कांस्य
३.झियान मोदी- सांघिक - सुवर्ण, फ्री हॅण्ड, रिबन-रौप्य, क्लब्ज- कांस्य
४.सायना ठक्कर- सांघिक-सुवर्ण, रोप-कांस्य
५.एंजेल शाह - सांघिक-सुवर्ण, हुप-रौप्य
६.भार्गवी भोसले- रिबन-कांस्य

* **लेवल – तीन**

७.समृध्दी घोष- हुप - सुवर्ण, सर्वसाधारण, सांघिक-रौप्य, फ्री हॅण्ड, क्लब्ज, बॉल-कांस्य
८.प्राची दळवी-रिबन- सुवर्ण, रोप क्लब्ज-रौप्य
९.तनिशा पटेल- सांघिक-सुवर्ण, रोप-कांस्य

* **लेवल – चार**

१०.क्रीशी जैन- हुप- रौप्य, क्लब्ज, सर्वसाधारण- कांस्य
११.गौतमी तेली- क्लब्ज- कांस्य

### २.१७ १२ व्या मिनी टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा

दि.१७ मार्च,२०१८ रोजी मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत १२ व्या मिनी टॅलेंट डिस्प्ले स्पर्धेत संस्थेच्या नवोदित खेळाडूंनी सहभाग घेवून चांगली कामगीरी केली. या स्पर्धेत मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयाच्या विविध भागातील सुमारे १५०० खेळाडूंनी उत्साही सहभाग घेतला. स्पर्धेला संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे, प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर उपस्थित होते.

### २.१८ मुंबई शहर जिल्हा जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा

मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत ११ वी आर्टिस्टिक, १० वी रिदमिक व ६ वी ॲक्रोबॅटिक्स, ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा दि.१८, १९, २४, २५ फेब्रुवारी,२०१८ आणि दि.३ व २२ मार्च २०१८ रोजी भारतीय क्रीडा मंदिर वडाळा व राजीव गांधी क्रीडा संकुल, धारावी येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत संस्थेच्या क्रीडा प्रशिक्षण केंद्रांतील खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळवून पदकांचे शतक पार करून घवघवीत यश संपादित केले.

### २.१९ २८ व्या मुंबई महापौर चषक राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.२६ व २८ जानेवारी,२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत व महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना, मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन व मुंबई शारीरीक शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने २८ व्या मुंबई महापौर चषक राष्ट्रीय आर्टिस्टीक्स जिम्नॅस्टिक्स सब-ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धा मंडळाचे व महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स संघटनेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया दिमाखात संपनन झाल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रासह कर्नाटक, राजस्थान, चंदीगड, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, गोवा, गुजरात, उत्तरप्रदेश, तेलंगना, हरियांना, आंध्रप्रदेश, केरळ, मणिपूर, छत्तिसगड, पॉडेचरी या १६ राज्यातील २०० खेळाडूंनी विक्रमी सहभाग नोंदविला. यजमान महाराष्ट्र संघाने मुले व मुली या दोनही गटांचे सांघिक अजिंक्य पद पटकावून मुंबई महापौर चषकावर आपले नांव कोरले.

### २.२० १४ वी सायकल राज्यस्तरीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स पंचवर्ग

दि. २ ते ४ मे २०१८ रोजी महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना, मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ आयोजित १४ वी सायकल राज्यस्तरीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स पंचवर्ग भारतीय क्रीडा मंदिर येथे संपन्न झाला. त्यावेळी सदर पंचवर्गाला संस्थेच्या प्रशिक्षिका कु.अक्षता शेटे यांनी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून कार्य केले.

### २.२१ १४ वी सायकल राष्ट्रीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स पंचवर्ग

दि. ९ ते ११ मे २०१७ रोजी महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ आयोजित १४ वी सायकल राष्ट्रीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स पंचवर्ग राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परेल येथे संपन्न झाला. त्यामध्ये विविध राज्यातील १५ पंचांनी सहभाग घेतला. या पंचवर्गास संस्थेच्या प्रशिक्षिका कु.अक्षता शेटे यांनी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून कार्य केले.

## २.२२ मंडळाचे वर्षभराचे राज्य, राष्ट्रीय खेळाडू

### अ. राज्यस्तरीय खेळाडू

१.कु.वेदांत देशमुख - आर्टिस्टिक्स
२.कु.प्रणय डाळे - आर्टिस्टिक्स
३.कु.मनिष कांबळे - आर्टिस्टिक्स
४.कु.कनका मांजरेकर - आर्टिस्टिक्स
५.कु.सिध्दी देसाई - आर्टिस्टिक्स
६.कु.पंकज सावंत - ट्रॅम्पोलिन
७.कु.साईराज पवार - ट्रॅम्पोलिन
८.कु.अनुश्री कदम - ट्रॅम्पोलिन
९.कु.वनेशा ठक्कर - रिदमिक
१०.कु.समृध्दी घोष - रिदमिक
११.कु.कृषी जैन - रिदमिक
१२.कु.मैथीली कांबळी - रिदमिक
१३.कु.प्रिशा धरमसी - रिदमिक
१४.कु.विनया करंगुटकर- रिदमिक
१५.कु.तन्मय घाणेकर - ॲरोबिक्स
१६.कु.वेदांग सरदार - ॲरोबिक्स
१७.कु.रिध्दी वीरा - ॲरोबिक्स
१८.कु.साक्षी पवार - ॲरोबिक्स
१९.कु.यश परदेशी- ॲरोबिक्स
२०.कु.नित्यानंद शेट्टी - ॲरोबिक्स
२१.कु.जैन मोदी - रिदमिक
२२.कु.स्याना ठक्कर - रिदमिक
२३.कु.भार्गवी भोळे - रिदमिक
२४.कु.समृध्दी घोष - रिदमिक
२५.कु.तनिषा पटेल - रिदमिक
२६.कु.क्षितिजा वाघमारे - रिदमिक
२७.कु.गौतमी तेली - रिदमिक

### ब. राष्ट्रीय खेळाडू

१.कु.आदित्य फडणीस - आर्टिस्टिक्स
२.कु.वेदांगी खैरे- आर्टिस्टिक्स
३.कु.शिवानी दौंड- ट्रॅम्पोलिन
४.कु.ऋतुजा ढेकले- ट्रॅम्पोलिन
५.कु.रिध्दी हरीया- ट्रॅम्पोलिन
६.कु.भुमिका ढोणे- रिदमिक

एकूणच गेल्या २४ वर्षापासून प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री.दादासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चालविण्यात येणा-या क्रीडा प्रशिक्षण केंद्रात आजवर अनेक राज्य व राष्ट्रीयस्तरावर व आंतरराष्ट्रीयस्तरावरील खेळाडू घडविले जात आहेत ही अत्यंत स्पृहणीय बाब आहे.

## ३. २२ वी राज्यस्तरीय ग्रीकोरोमन अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने मुंबई शहर तालीम संघ आणि मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ व १३ जानेवारी २०१८ या कालावधीत २२ व्या राज्यस्तरीय ग्रीकोरोमन अजिंक्यपद स्पर्धा भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई येथे यशस्वीरित्या पार पडल्या.

या स्पर्धेचे उद्घाटन दि.१२ जानेवारी २०१८ रोजी सायं.५.०० वा. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सरचिटणीस मा.बाळासाहेब लांडगे आणि उपाध्यक्ष मा. सर्जेराव शिंदे यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुंबई शहर तालीम संघाचे कार्याध्यक्ष मा.संजय शेटे, उपाध्यक्ष मा.शशिकांत देशमुख तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोरक्ष पारगांवकर, मुंबई शहर तालीम संघाचे उपाध्यक्ष श्री. विठ्ठल भोसले, सरचिटणीस श्री.प्रकाश तानवडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

अंतिम फेरीच्या कुस्त्या आणि बक्षीस वितरण समारंभ दि.१३ जानेवारी २०१८ रोजी सायं.५.०० वा. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.संजय शेटे यांचे शुभहस्ते पार पडला. तसेच याप्रसंगी श्री.विठ्ठलराव भोसले [संचालक मुंबई बॅक], श्री.शशिकांत देशमुख [उपाध्यक्ष मुंबई शहर तालीम संघ], श्री.प्रकाश तानवडे [सरचिटणीस मुंबई शहर तालीम संघ], प्रा.डॉ.राजेंद्र ढाकणे, प्रा.डॉ.घनश्याम ढोकरट इ.मान्यवर उपस्थित होते.
सदर स्पर्धेमध्ये राज्याच्या विविध जिल्हयातील २५५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. सदर स्पर्धेमध्ये कोल्हापरू शहराने सांघिक विजेतेपर पटकाविले. स्पर्धेचा अंतिम निकाल पुढील प्रमाणे--

**प्राविण्यधारक कुस्तीगीर यादी**

| अ.क्र. | कुस्तीगीराचे नांव | जिल्हा/शहर | अ.क्र. | कुस्तीगीराचे नांव | जिल्हा/शहर |
|---|---|---|---|---|---|
| | | **५५ किलो** | | | **७७ किलो** |
| १ | अभिजित पाटील | कोल्हापूर जि. | १ | तानाजी विरकर | सातारा |
| २ | अनिकेत मगर | सोनपूर जि. | २ | सुभाष पाटील | कोल्हापूर जि. |
| ३ | विठ्ठल कांबळे | कोल्हापूर जि. | ३ | संदिप निकम | नाशिक शहर |
| ३ | संतोष यादव | मुंबई पूर्व | ३ | संकेत चव्हाण | पिंपरी चिंचवड |
| | | **६० किलो** | | | **८२ किलो** |
| १ | गोविंद यादव | मुंबई पश्चिम | १ | अण्णासाहेब जगताप | सोनपूर जि. |
| २ | सद्दाम शेख | कोल्हापूर जि. | २ | अभिषेक फुगे | पिंपरी चिंचवड |
| ३ | बापू कोळेकर | सांगली | ३ | सनिष अडसुळ | कोल्हापूर जि. |
| ३ | संदिप बिराजदार | मुंबई पूर्व | ३ | शिवाजी पाटील | सोनपूर शहर |

| अ.क्र. | कुस्तीगीराचे नांव | जिल्हा/शहर | अ.क्र. | कुस्तीगीराचे नांव | जिल्हा/शहर |
|---|---|---|---|---|---|
| | | **६३ किलो** | | | **८७ किलो** |
| १ | विक्रम कु-हाडे | कोल्हापूर जि. | १ | योगेश शिंदे | पुणे जि. |
| २ | विशाल कोंडेकर | कोल्हापूर शहर | २ | बाळू सपाटे | सोलापूर शहर |
| ३ | पंकज पवार | लातुर | ३ | ऋषिकेश बोमने | लातूर |
| ३ | प्रथमेश काळे | धुळे | ३ | अक्षय जाधव | पुणे शहर |
| | | **६७ किलो** | | | **९७ किलो** |
| १ | प्रितम खोत | कोल्हापूर जि. | १ | नागेश शिंदे | औरंगाबाद |
| २ | शुभम कोंडेकर | कोल्हापूर शहर | २ | अतुल माने | कोल्हापूर जि. |
| ३ | ओंकार शिंदे | सातारा | ३ | अर्जुन साठे | सोलापूर शहर |
| ३ | अमित कदम | पुणे जि. | ३ | राहुल चव्हाण | सातारा |
| | | **७२ किलो** | | | **१३० किलो** |
| १ | दादा सरवदे | सोलापूर शहर | १ | शैलेश शेळके | लातुर |
| २ | सचिन खोत | सांगली | २ | अब्दुल पटेल | कोल्हापूर शहर |
| ३ | सागर पाटील | कोल्हापूर जि. | ३ | तुषार डिबळे | पुणे शहर |
| ३ | गौरव ठाकरे | धूळे | ३ | कुमार पाटील | कोल्हापूर जि. |

## ४. शालेय लेझीम स्पर्धा

कै.दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या शालेय लेझीम स्पर्धा प्रतिवर्षाप्रमाणे दि.२९ जानेवारी, २०१८ रोजी झाल्या. स्पर्धेत १२ शाळांतील सुमारे १२५० शालेय मुला-मुलींनी भाग घेतला. या स्पर्धेत एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण या शाळेने प्रथम क्रमांक पटकावून कै.दत्ताराम लाड चषक, स्मृतिचिन्ह व पाच हजार रूपयांचे बक्षीस मिळविले. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर माध्यमिक, डोंबिवली (पूर्व) या शाळेने द्वितीय क्रमांक मिळवून स्मृतिचिन्ह व तीन हजार रूपयांचे बक्षीस मिळविले.

शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, अभ्युदयनगर, काळाचौकी या शाळेने तृतीय क्रमांकासह दोन हजार रूपये व स्मृतिचिन्ह पटकावले. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर प्राथमिक, डोंबिवली (पूर्व), स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, अरूणोदय माध्यमिक, डोंबिवली (पश्चिम), सोशल सर्विस लीग, परेल, या शाळांनी चतुर्थ क्रमांकाचे उत्तेजनार्थ स्मृतिचिन्ह मिळविले व सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. त्याचबरोबर **उत्कृष्ठ ढोलवादक**– कु.प्राची बाबर, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर माध्यमिक, डोंबिवली (पूर्व), **उत्कृष्ठ हलगीवादक**– कु.आकाश कांबळे, सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल. **उत्कृष्ठ ताशावादक**– कु.सागर वाघमारे, एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण. **उत्कृष्ठ तुतारीवादक**– कु.हर्ष चौगुले, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, अरूणोदय माध्यमिक, डोंबिवली (पश्चिम).

स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी विशेष अतिथी श्री.थोंगम सुनिल मेयट्‌टी, मॅनेजर, मनिपूर जिम्नॅस्टिक असोसिएशन, श्री.जोशीसर मुख्याध्यापक सार्वजनिक विद्यामंदिर, इंग्रजी माध्यम, काळाचौकी, डॉ.(श्रीमती) शेफाली पंडया [शिक्षणशास्त्र विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ], डॉ.विश्वंभर जाधव (प्राध्यापक मुंबई विद्यापीठ), मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय बाबूराव शेटे, प्रमुख कार्यवाह मा.श्री.दिपक शेटे, मंडळाचे सदस्य श्री.संग्रामसिंह शेटे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर, महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

स्पर्धेचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे –

| क्र. | ‘kkGsps ukao | xq.k 100 iSdh |
|---|---|---|
| १ | एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण | 77-10 |
| २ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर माध्यमिक, डोंबिवली (पूर्व) | 74-10 |
| ३ | शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, काळाचौकी | ७०.८० |
| ४ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर प्राथमिक, डोंबिवली (पूर्व), | ६९.९० |
| ५ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, अरूणोदय माध्यमिक, डोंबिवली पश्चिम | ६६.०० |
| ६ | सोशल सर्व्हिस लीग, परेल | ६३.०० |
| ७ | एस.एम.शेट्‌टी, पवई | 62-70 |
| ८ | नालंदा पब्लिक स्कूल, मुलुंड | 61-20 |
| ९ | प्रबोधन माध्यमिक शाळा, विठ्ठलमंदिर, कुर्ला पश्चिम | 56-40 |
| १० | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, विष्णुनगर, डोंबिवली पश्चिम | ५४.०० |
| ११ | समता विद्यामंदिर, कांदिवली | ४४.१० |
| १२ | अहिल्या विद्यामंदिर, इंग्रजी माध्यम, काळाचौकी | ४१.७० |

## ५. अमृत महोत्सवी हिंद ट्रॉफी आंतर शालेय सामने व गौरव समारंभ–

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळद्वारा आयोजित ७५ व्या अमृतमहोत्सवी हिंद ट्रॉफी आंतरशालेय सामन्यांचे दि.१० ते १२ जानेवारी,२०१८ च्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे, मा.खासदार श्री.राहुल शेवाळे, माजी महापौर श्रीमती श्रध्दा जाधव, मा.श्री.अमेय घोले(स्थानिक नगरसेवक), श्रीमती माधुरी मांजरेकर(समाजसेविका), तसेच मुंबई शारिरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय बाबूराव शेटे, प्रमुख कार्यवाह मा.श्री. दिपक शेटे, खजिनदार श्री.शामराव मोरे व कार्यकारी समितीच्या सदस्या श्रीमती नलिनी फडणीस, सदस्य सर्वश्री दिपक कांदळगांवकर व रघुनाथ गुरव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उद्‌घाटनप्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर लिखित हिंद ट्रॉफी आंतरशालेय सामने यावर ‘अमृत महोत्सवी यशोगाथा’ या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. सदर स्पर्धेत एकूण ५२ शाळांच्या सुमारे १६१६ [मुले–९५६, मुली–६६०] खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत १५ वर्षाखालील आंतरशालेय मुला–मुलींच्या कबड्‌डी, खो–खो व लंगडी या खेळाचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे–

**खो-खो [मुले]** -**प्रथम क्रमांक** - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
**द्वितीय क्रमांक** - रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरने
**तृतीय क्रमांक** - के.एम.एस.डॉ.शिरोडकर हायस्कूल, परेल
**चतुर्थ क्रमांक** - नंदादिप विद्यालय, गोरेगांव
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.योगेश आग्रे, महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

**खो-खो [मुली] - प्रथम क्रमांक** - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
**द्वितीय क्रमांक**- रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरने
**तृतीय क्रमांक** - श्री मावळी मंडळ, ठाणे
**चतुर्थ क्रमांक** - सरस्वती विद्यामंदिर, माहिम
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.साक्षी वाफेलकर,महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

**कबड्डी [मुले]** - **प्रथम क्रमांक** - रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरने
**द्वितीय क्रमांक** -उत्कर्ष मंदिर, मालाड
**तृतीय क्रमांक** - सरस्वती विद्यालय, घाटकोपर
**चतुर्थ क्रमांक** -श्री.हशु अडवानी मेमोरियल हायस्कूल, गोवंडी
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.मोहन बाबू पुजारी, रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने

**कबड्डी [मुली]** -**प्रथम क्रमांक** - उत्कर्ष मंदिर, मालाड
**द्वितीय क्रमांक** - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
**तृतीय क्रमांक** - लक्ष्मी विद्यालय, ठाणे
**चतुर्थ क्रमांक** -एस.एस.एम. मेहता हायस्कूल, काळाचौकी
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.राशी कोर्पे, उत्कर्ष मंदिर, मालाड

**लंगडी [मुले]** - **प्रथम क्रमांक** - डॉ.त्रि.रा.नरवणे विद्यालय, कांदिवली
**द्वितीय क्रमांक** - सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल
**तृतीय क्रमांक** - शारदाश्रम विद्यामंदिर, दादर
**चतुर्थ क्रमांक** - गणेश विद्यालय, वडाळा
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.सोयम उंद्रे, डॉ.त्रि.रा. नरवणे विद्यालय, कांदिवली

**लंगडी [मुली]** - **प्रथम क्रमांक** - म.न.पा. तानसा, ठाणे
**द्वितीय क्रमांक** -म.न.पा. धामण, ठाणे
**तृतीय क्रमांक** - डॉ.त्रि.रा.नरवणे विद्यालय, कांदिवली
**चतुर्थ क्रमांक** - सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल
**उत्कृष्ठ खेळाडू** म्हणून कु.अर्चना चौधरी, म.न.पा. तानसा, ठाणे

सन २०१७-१८ या वर्षातील **टोपीवाला हिंद ट्रॉफीची मानकरी शाळा रा.फ. नाईक विद्यालय, कोपरखैरने असून राणी लक्ष्मीबाई हिंद ट्रॉफीची मानकरी शाळा महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे ही शाळा झाली.** हिंद ट्रॉफी पटकावणा-या शाळेस प्रत्येकी रोख रू.२,०००/- व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. सदर स्पर्धेत सर्व खेळातील प्रथम क्रमांक पटकाविणा-या शाळेस रोख रू. १,०००/- व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. द्वितीय क्रमांक पटकावणा-या शाळेस स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच उत्कृष्ठ खेळाडूंना डॉ.काशिनाथ दादाराव ढोकरट यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख रू.५००/- व स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.

**हिंद ट्रॉफी सामने अमृत महोत्सवी गौरव समारंभ-**

स्पर्धा समारोप प्रसंगी हिंद ट्रॉफी सामन्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त [सन १९४३-२०१७] मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाने या स्पर्धांमध्ये बालपणापासून अनेक वर्षे खेळून नावारूपास आलेल्या मातब्बर खेळाडूंचा तसेच सदर सामने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्या विविध शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी अनेक वर्षे मंडळास मोलाची मदत केली त्या सर्वांचा पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व शाल देवून यशोचित गौरव

केला. गौरव समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री.सदानंद शेटे [कबड्डी, प्रथम अर्जून पुरस्कार विजेते] तर विशेष अतिथी म्हणून मा.श्री.नामदेव शिरगांवकर[भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे सहसचिव], श्री.रामेश्वर लोहे [वरिष्ठ पर्यवेक्षक, शिक्षण विभाग म.न.पा.मुंबई], श्री.मनोहर इंदुरकर [कार्याध्यक्ष, मुंबई शहर कबड्डी असोसिएशन] तसेच कबड्डीचे प्रसिध्द ज्येष्ठ खेळाडू व श्री शिवछत्रपती विजेते श्रीमती माया आक्रे व श्री.जया शेट्टी इ. मान्यवर उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान मा.श्री. संजय शेटे [अध्यक्ष, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ] यांनी भुषविले. गौरव मुर्तीमध्ये खालील व्यक्तींचा समावेश होता--

**अ. राज्य व राष्ट्रीय पुरस्कार विजेते खेळाडू**

१.श्री.सदानंद शेटे- अर्जून पुरस्कार विजेते खेळाडू
२.श्रीमती माया आक्रे मेहेर- अर्जून पुरस्कार विजेते खेळाडू
३.श्रीमती मोनिका नाथ बाक्रे- अर्जून पुरस्कार विजेते खेळाडू

**ब. श्री शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते खेळाडू**

१.श्री.जया शेट्टी २.श्रीमती छाया शेट्टी ३.श्री.गौरव शेट्टी
४.श्री.तारक राऊळ ५.श्री.रामचंद्र जाधव ६.श्री.सिताराम साळुंखे
७.श्रीमती चित्रा नाबर ८.श्रीमती सुवर्णा बारटक्के ९.श्रीमती स्नेहल साळुंखे
१०.श्रीमती लता पांचाळ ११. श्रीमती गौरी बेडेकर १२.श्रीमती ग्रेटा डिसोझा
१३.श्रीमती तृप्ती सुवर्णा १४.श्रीमती विणा खवळे १५.श्री. रवी करमरकर
१६.श्रीमती भारती विधाते भुजबळ १७.श्री.नरेंद्र कुंदर १८.श्री.अनिकेत पोटे

**क.विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व क्रीडा कार्यकर्ते-**

१.श्रीमती नलिनी फडणीस- पोदार कन्याशाळा, कार्यकारीणी सदस्य
२.श्रीमती शालिनी फडणीस- पार्ले टिळक विद्यालय
३.श्री.अर्जून विश्राम पाटकर- कार्यकारीणी सदस्य
४.श्री.नाईक सर- सरस्वती विद्यामंदिर, माहिम
५.श्री.मुकुंद संभाजी फडतरे- सोशल सर्व्हिस लिग हाय., परेल
६.श्री.वसंत वालझडे- शिरोडकर हाय., परेल
७.श्रीमती रंजना प्रभाकर चंदने - शिरोडकर हाय., परेल
८.श्री.अनंता धर्मु खामकर- महाराष्ट्र हायस्कूल नं.२
९.श्रीमती प्रमिला नागरे-सरस्वती हायस्कूल
१०.श्री.उत्तम माने-लोकमान्य विद्यामंदिर
११.श्री.कमल सैद- सानेगुरूजी विद्यालय, दादर
१२.श्रीमती अंजली गीरी- म.फुले हायस्कूल
१३.श्री.गजानन वाईरकर
१४.श्री.भाई वाकडे
१५.श्री.एस.एफ.लोपीस
१६.श्री.सुरेश सावंत १७.श्री.किसन कदम १८.श्री.सुहास जोशी, पत्रकार
१९.श्री.उमेश म्हसकर- डॉ.शिरोडकर हायस्कूल २०.श्रीमती पगारे-डॉ.शिरोडकर हाय.
२१.श्रीमती वैशाली शशिकांत चव्हाण- सो.स.लीग हायस्कूल परेल
२२.श्री.सूर्यकांत देसाई २३.श्री.बापू खरमाळे- सो.स.लीग हायस्कूल परेल
२४.श्री.नामदेव यशवंत राऊळ २५.श्री.सागर फापाळे सरस्वती मंदिर हाय. परेल
२६.श्री.लक्ष्मण डिसले- आर एम भट हायस्कूल, परेल
२७.श्री.तुकाराम खारेघरे एम सी मेहता गर्ल्स हायस्कूल, काळाचौकी
२८.श्री.सुनिल रॉड्रीग्ज डॉ.नरवणे हायस्कूल, कांदिवली
२९.श्री.एम.एन.दिवेकर क्रांतीसिंह नाना पाटील विद्यालय, नायगांव
३०.श्री.अनंत जगताप ३१.श्री.सुरेंद्र विश्वकर्मा ३२.ॲड.अरूण देशमुख
३३.श्री.दिपक कांदळगांवकर, कार्यकारीणी सदस्य
३४.श्री.जनार्दन टेमकर, शारदाश्रम विद्यामंदिर
३५.श्री.धैर्यधर पाटील ३६. प्राचार्य डॉ.पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १८ वर्षे हिंद करंडक स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडणारे महाविद्यालयाचे सर्व शिक्षक कर्मचारी

संपूर्ण गौरव समारंभाचे भव्य आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.

## ६. कबड्डी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१७-१८ ची मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा व्यावसायिक विशेषगट, प्रथम व द्वितीय श्रेणी, स्थानिक प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणी, कुमार-कुमारी गट मुले-मुली तसेच महिला स्थानिक व व्यावसायिक अशा विविध गटात १२/१२ श्रेणीच्या स्पर्धेचे आयोजन रविवार दि.१ ऑक्टों. ते ९ ऑक्टो.२०१७ [किशोर व किशोरी विभाग] शनिवार दि.७ ते ८ आक्टोंबर,२०१७ [कुमार-कुमारी विभाग] व उर्वरीत सामने दि.२४ ऑक्टो. ते १२ नोव्हें.,२०१७ या कालावधीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या सहकार्याने भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे घेण्यात आल्या. प्रतिदिनी सहा क्रिडांगणावर सायं.७ ते १० या वेळेत प्रकाश झोतात सामने झाले. स्पर्धेचे उद्घाटन मुंबई शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी संघटनेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते.

## ७. होळी उत्सवाचे आयोजन

दि.१ मार्च २०१८ रोजी संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे यांनी होळीचे पुजन करून होळी पेटविली. त्यावेळी संस्थेचे पदाधिकारी श्री.दिपक शेटे, श्रीमती अनुराधा शेटे, संग्रामसिंह शेटे, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे पालक, विद्यार्थी, स्थानिक नागरिक, डॉ.गो.वि. पारगांवकर इत्यादी मोठया संख्येने उपस्थित होते.

## ८. मुंबई विद्यापीठ प्र-कुलगुरू व अधिसभा सदस्यांचा गौरव समारंभ-

दि.१७ डिसेंबर २०१७ रोजी असोसिएशन ऑफ नॉन गर्व्हमेंट कॉलेजेस् मुंबई विद्यापीठ [ANGC] यांच्यावतीने मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व अमेठी विद्यापीठचे कुलगुरू डॉ.विजय खोले यांच्या शुभहस्ते एनएनडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्राचार्य डॉ.विष्णु नंदा मगरे तसेच मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्वतसभा सदस्य व अधिष्ठाता यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. गौरव मुर्तीमध्ये प्रो.डॉ.गौतम गवळी, डॉ.एम एस कु-हाडे, डॉ.मधु नायर, प्रो.डॉ.शेफाली पंडया, डॉ.रश्मी ओझा, डॉ.विठ्ठल रोकडे इ. मान्यवरांचा समावेश होता. याप्रसंगी डॉ.तुकाराम शिवारे, श्री.महादेव जगताप, श्री. संतोष गांगुर्डे, श्री.अजितसिंग, श्री.संजय साळुंखे, प्राचार्य इंगवले, प्रो.विलास शिंदे, प्राचार्य फडके, डॉ.देसाई व मा.श्री.संजय शेटे [अध्यक्ष, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ] इ. मान्यवर उपस्थित होते.

## ९. लंगडी पंच वर्ग व पंच परीक्षा

अहवालसाली मंडळाच्यावतीने महाविद्यालयाने लंगडी खेळाचे पंचवर्ग व पंच परीक्षेचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयाच्या १०० शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांनी भाग घेतला.

## १०. कुस्ती पंच व मार्गदर्शक उजळणी शिबिर-

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद व मुंबई शहर तालीम संघाच्यावतीने दि.११ नोव्हेंबर २०१७ रोजी कुस्तीचे पंच व मार्गदर्शक यांच्यासाठी कुस्तीच्या अद्यावत तंत्र व नियमांचे उजळणी शिबिर घेण्यात आले. सदर शिबिराला राज्यातील विशेषत: कोकण विभागातून विविध जिल्हयाचे १२५ पंच व मार्गदर्शक उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटक मा.श्री.सर्जेराव शिंदे उपाध्यक्ष म.रा.कु.प. यांचे हस्ते झाले. शिबिराला तज्ञ मार्गदर्शक व प्रथम श्रेणी आंतरराष्ट्रीय पंच श्री.दिनेश गुंड, श्री.मारूती सातव [शासकीय मार्गदर्शक] व श्री नवनाथ ढमाळ [आंतरराष्ट्रीय पंच] यांचे मार्गदर्शन लाभले. सदर प्रसंगी ऑलिम्पिकवीर श्री.मारूती आडकर, श्री.ललित बाळासाहेब लांडगे [कार्यकारीणी सदस्य म.रा.कु.प.], श्री.संपत साळुंखे, श्री.शशिकांत देशमुख, श्री.प्रकाश तानवडे व श्री.संजय शेटे [अध्यक्ष मुं.शा.शि.मंडळ] इ. मान्यवर उपस्थित होते.

## ११. योग अभ्यास केंद्र

संस्थेच्यावतीने भारतीय क्रीडा मंदिरात प्राचार्य गो.वि. पारगांवकर यांच्या पुढाकारामुळे व मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या योगाभ्यास केंद्रामध्ये श्री.दिलिप पोदार, श्रीमती सुनिता बसिन व श्रीमती हर्षा निसार यांनी योग शिक्षक म्हणून शिक्षकांचे कार्य करून संस्थेस सहकार्य केले. रोज सकाळी ६.३० ते ७.३० यावेळेत

चालविण्यात आलेल्या योगासन वर्गाचा लाभ सुमारे ३० ते ३५ स्थानिक स्त्री-पुरूषांनी घेतला.

**१२. व्यायामशाळा**

अहवालसाली भारतीय क्रीडा मंदिराच्या दुस-या मजल्यावर संस्थेद्वारे स्थापन करण्यात आलेल्या अद्यावत व्यायामशाळेचा लाभ महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी-विद्यार्थीनी व सुमारे १५० स्थानिक पुरूष व महिलांनी घेतला. अहवालसाली श्री.अली व श्री.असलम शेख यांनी प्रमुख व्यायाम प्रशिक्षक म्हणून काम केले.

**१३. इतर संस्थांचे क्रीडा विषयक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या भारतीय क्रीडा मंदिराचे स्टेडियम, क्रीडांगण, व्यायाम शाळा आणि वसतिगृह यांचा खेळ, शिक्षण, तसेच समाज व राष्ट्रोपयोगी कार्यासाठी जास्तीत जास्त उपयोग व्हावा यासाठी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ सतत प्रयत्नशील आहे.

अहवालसाली संस्थेच्या भारतीय क्रीडा मंदिरात विविध क्रीडा संस्था, मंडळे, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, मुंबई महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर आणि महाराष्ट्र शासन यांनी आयोजित केलेल्या खालील स्पर्धा आणि कार्यक्रम पार पडले.

१ मुंबई शहर व्हॉलीबॉल असो., जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व सराव शिबिर- दि.१७ जून २०१७
२ मुंबई शहर कबड्डी असोसिएशन सर्वसाधारण सभा - दि.१८ जून,२०१७
३ दि सातारा सहकारी बँक मर्यादित, विशेष सर्वसाधारण सभा -दि.१ जूलै, २०१७
४ कै.राजाराम पवार शोकसभा, मुंबई शहर कबड्डी असोसिएशन व मुं.शा.शि.मंडळद्वारा आयोजित- दि.४ जुलै २०१७
५ योगविद्यानिकेतन, दादर, उन्हाळी वर्ग- दि.१ मे ते ३१ मे २०१७
६ विभागस्तरीय खेळनिहाय कौशल्य चाचण्या, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई आयोजित दि.१७ व १८ जुलै २०१७
७ वेलनेस फॉरएव्हर, मेडिकेअर प्रा.लि. वडाळा, मुंबई आयोजित कर्मचारी प्रशिक्षण- दि.६ मे ते ३० ऑगष्ट २०१७ [३६ दिवस]
८ मिलेनियन फुटबॉल, जिल्हा क्रीडाधिकारी, मुंबई शहर, महाराष्ट्र शासनाद्वारे आयोजित फुटबॉल स्पर्धा - दि.१५ सप्टेंबर २०१७
९ दि सातारा सहकारी बँक द्वारा आयोजित कै.बाबुरावजी शेटे २६ वी पुण्यतिथी- दि.१९.९.२०१७
१० दि महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बॅक्स फेडरेशन वार्षिक सर्वासाधरण सभा- १९ सप्टेंबर २०१७
११ जिल्हास्तरीय शालेय ॲक्रोबेटिक्स क्रीडा स्पर्धा, मुंबई जिल्हा क्रीडाधिकारी आयोजित दि.१० ऑक्टोंबर २०१७
१२ राज्यस्तरीय कबड्डी पंचपरीक्षा महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. अयोजित- दि.२ ऑक्टों. ,२०१७
१३ मुंबई शहर कबड्डी असोसिएशनद्वारा आयोजित जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी- दि. ३ स्पष्टेंबर २०१७ ते ८ ऑक्टोबर,२०१७ व २४ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०१७.
१४ मुंबई स्कूल स्पोर्टस असो.द्वारे आयोजित आंतरशालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा- दि.१७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१७[एकूण ७ दिवस].
१५ मुं.शा.शि.मंडळ पुरस्कृत कुस्ती पंच व मार्गदर्शक उजळणी शिबिर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद व मुंबई शहर तालीम संघद्वारा आयोजित दि.११ नोव्हेंबर २०१७
१६ मुंबई विद्यापीठ प्राचार्य संघटना [ए.एन.जी.सी.] सभा- दि.२६ नोव्हेंबर २०१७
१७ मुंबई विद्यापीठ नवनियुक्त विद्ववत्त सभा व व्यवस्थापन परिषद सदस्यांचा तसेच डॉ.विष्णु नंदा मगरे प्र-कुलगुरू, एस.एन.डी.टी. विद्यापीठ यांचा गौरव समारंभ, [प्राचार्य संघटना ए. एन.जी.सी.] यांच्यावतीने दि.१७ डिसेंबर २०१७
१८ मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंचवर्ग-पंचपरीक्षा- दि.११ ते १७ डिसेंबर २०१७
१९ मुंबई शहर तालिम संघ, २१ वी ग्रिकोरोमन राज्य अजिंक्यपद स्पर्धा- दि.१२ व १३ डिसेंबर २०१७.
२० आय ई एस शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा- दि.५ जानेवारी २०१८.
२१ २२वी राज्यस्तरीय ग्रीकोरोमन अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा मुं.शहर तालीम संघ- दि.१२ व १३ जानेवारी २०१८
२२ ५२वी ज्युनिअर व सिनिअर आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा मुं.शा.शि. मंडळ - दि.२४ व २५ जानेवारी २०१८
२३ २८ वी मुंबई मेअर ट्रॉफी सब ज्युनिअर आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा मुं.शा.शि.मंडळ व मुं.श.जि. असो.- दि.२६, २७, २८ जानेवारी २०१८

२४ अखिल भारतीय विद्यार्थी परिषदद्वारा आयोजित साहस इंडिया कार्यक्रम दि.२,३ व ४ फेब्रुवारी २०१८.

२५ दि सातारा सहकारी बॅक लि. कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम दि.२५ फेब्रुवारी २०१८ ते ३० एप्रिल २०१८ प्रत्येक रविवारी एकूण १० दिवस

२६ मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित टॅलेंट डिसप्ले स्पर्धा -दि.१७ मार्च २०१८

२७ मुंबई शहर व्हॉलीबॉल असोसिएशनद्वारा आयोजित मुंबई महापौर व्हॉलीबॉल स्पर्धा दि.६ ते ८ एप्रिल २०१८

२८ स्वा.सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर यांच्यावतीने आयोजित १३५ व्या जयंतीनिमित्त दृक्श्राव्य, नृत्य, नाटय व संगितमय कार्यक्रम दि.२६ मे २०१८

२९ मुंबई महापौर राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धा दि.२६ व २७ मे २०१८

## १४. श्रध्दांजली:-

अहवालसाली मंडळाशी संबंधित तसेच देशभरातील ज्या नामवंत व थोर व्यक्तींचे निधन झाले, त्या सर्वांना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यात प्रामुख्याने श्रीमती किशोरी अमोणकर, शास्त्रीय संगित गायिका (दि.3 एप्रिल, २०१७), श्री.विनोद खन्ना,हिंदी सिनेकलावंत( दि.22 एप्रिल, २०१७), श्रीमती रिमा लागू प्रसिध्द लोकप्रिय सिनेकलावंत ( दि.१८ मे, २०१७), श्री.अनिल माधव दवे, केंद्रिय पर्यावरण मंत्री (दि.१८ मे, २०१७), श्री.प्रभाकर पानसरे व श्री.राजाभाऊ तुकाराम पवार, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ कार्यकारी समिती सदस्य (अनुक्रमे दि.२७ फेब्रुवारी २०१८ व २७ जून, २०१७), श्री.शिवाजीराव गिरिधर पाटील, स्वातंत्रसेनानी व वरिष्ठ कॉग्रेस नेते (दि.२२ जुलै, २०१७), श्रीमती शिरिष पै, ज्येष्ठ मराठी लेखिका (दि.2 सप्टेंबर,, २०१७), श्रीमती गौरी लंकेश, वरिष्ठ पत्रकार व संपादिका( दि.५ सप्टेंबर, २०१७), श्रीमती गिरिजा देवी, शास्त्रीय संगित गायिका ( दि.२४ ऑक्टोंबर, २०१७, श्री.शशी कपूर, प्रसिध्द लोकप्रिय हिंदी सिनेकलावंत (दि.४ डिसेंबर, २०१७), श्रीमती श्रीदेवी, प्रसिध्द लोकप्रिय हिंदी सिनेकलावंत (दि.२४ फेब्रुवारी, २०१८), स्वामी जयेंद्र सरस्वती शंकराचार्य, अध्यात्मिक गुरू (दि.२८फेब्रुवारी, २०१८), श्री.**पतंगराव कदम,** ज्येष्ठ राजकिय नेते आणि संस्थापक, भारती विद्यापीठ, पुणे (दि.९ मार्च, २०१८), **स्टीफन विल्यम हॉकिंग, भौतिकशास्त्रज्ञ आणि विश्वशास्त्रज्ञ** (दि.१४ मार्च, २०१८), श्री.**हिमांशु रॉय**, **उपमहासंचालक**, महाराष्ट्र **पोलीस** (दि.११मे, २०१८), श्री.**पांडुरंग पुंडलिक फुंडकर,** ज्येष्ठ राजकिय नेते आणि कृषी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (दि.३१ मे, २०१८), श्री.**भय्यूजी महाराज**, अध्यात्मिक गुरु अणि समाजसेवक(दि.१२ जून, २०१८).

या सर्वांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने परमेश्वर चरणी प्रार्थना !!

## १५. आभार

वर्षभरात विविध प्रसंगी विविध क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ञ आणि थोर व्यक्तींनी संस्थेस भेटी देऊन मार्गदर्शन केले तसेच होत असलेल्या संस्थेच्या कार्याचे कौतुक करून आम्हास प्रेरणा दिली. संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन अनेक शाळा, संस्था आणि व्यक्तींनी मंडळास सहकार्य केले. महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालय व संस्थेला अनुदानरूपाने आर्थिक सहकार्य मिळाले. अनेक व्यक्ती आणि संस्थांनी मंडळाच्या उपक्रमांसाठी आर्थिक आधार दिला, त्या सर्वाचे मन:पूर्वक आभार. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा उत्कर्ष आपणा सर्वांवर अवलंबून आहे, याची जाणीव मंडळाला सदैव आहे. बलशाली भारताचे स्वप्न उराशी बाळगून कार्य कारणा-या आणि अमृत महोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करीत असलेल्या आमच्या मुंबई शारीरिक शिक्षण मंडळास आपण भविष्यातही सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,

दिपक बाबूराव शेटे
जनरल सेक्रेटरी,
मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

स.न.वि.वि.

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या ८३ व्या वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १५ सप्टेंबर, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वा. भारतीय क्रीडा मंदिर, पहिला मजला सभागृह, वडाळा, मुंबई- ३१ येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय:-

१. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

२. सन २०१७-२०१८ चा मंडळाचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०१७-२०१८ चे मंडळाचे वार्षिक जमाखर्च व ताळेबंद तक्ता वाचून मंजूर करणे.

४. सन २०१८-२०१९ सालासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करून मंजूर करणे.

५. सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे.

६. कार्यकारी समितीच्या संमतीने आलेल्या सूचनांचा विचार करणे व अध्यक्षांचे परवानगीने येणारी आयत्या वेळेची कामे.

सूचना:-

१. गणसंख्येच्या अभावी सदर सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी तहकुब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटांनंतर सुरू होईल. अशाप्रकारे तहकुब होवून सुरू झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता रहाणार नाही.

२. ज्या सभासदांना सर्वसाधारण सभेपुढे सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपुर्वी पाच दिवस अगोदर सूचक अनुमोदकाच्या सहीनिशी मंडळाच्या कचेरीत लेखी पाठविण्याची कृपा करावी. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक: ३० ऑगष्ट २०१८

आपला नम्र,

श्री.दिपक बाबुराव शेटे
प्रमुख कार्यवाह

कचेरीः भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव—वडाळा क्रॉस रोड, वडाळा, मुंबई—400031

## ‼ आदरांजली ‼

## कै.प्रभाकर रामचंद्र पाणसरे

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या कार्यकारी समितीचे सदस्य श्री.प्रभाकर रामचंद्र पाणसरे यांचे दि.२७ फेब्रुवारी २०१८ रोजी वयाच्या ८९ व्या वृध्दपकाळाने दु:खद निधन झाले. कै.प्रभाकर पाणसरे गेली अनेक वर्षे मंडळाच्या कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून मंडळाच्या कार्यात सक्रीय होते. त्यांच्या निधनाने मंडळाच्या कार्यात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने कै.प्रभाकर रामचंद्र पाणसरे यांना विनम्र अभिवादन व भावपूर्ण आदरांजली !